
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
वर्ष १६ ◆ अंक ३११
www.ramprahar.com
बुधवार, २९ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

सरकारच्या योजनांमुळे महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक/२
जाहिरातीला भुलून महिलेने गमावले कोट्यवधी रुपये/६
नवी मुंबईतील कराटेपटूंनी नेपाळमध्ये जिंकली पदके/८

## गडचिरोलीत जहाल नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण



**गडचिरोली :** सहा लाख रुपये बक्षीस असलेला जहाल नक्षलवादी गणेश गट्टा पुनेम (वय ३५) याने मंगळवारी (दि. २८) पोलिसांकडे आत्मसमर्पण केले. गणेश पुनेम हा मूळचा छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातील बेचापाल, भैरमगड येथील रहिवासी आहे. नक्षली गणेशने सीआरपीएफचे पोलीस उपमहानिरीक्षक जगदीश मीणा यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. त्यानंतर त्यांनी त्याचे हस्तांतरण गडचिरोली पोलीस दलाकडे केले आहे. प्रशासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून अनेक जहाल नक्षलवाद्यांनी आजपर्यंत पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित नक्षलवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवून आणल्याने एकूण ६६२ जणांनी गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केलेले आहे. **(अधिक वृत्त पान २ वर..)**

### राज्य आपत्ती निवारण विभागाची बैठक

# मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती निवारण विभागाची आढावा बैठक मंगळवारी (दि. २८) मुंबईत पार पडली. या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार उपस्थित होते. राज्यभरात करण्यात आलेला मान्सूनपूर्व तयारीचा आढावा या वेळी घेण्यात आला.



प्रामुख्याने राज्यातील एसडीआरएफच्या टीमची संख्या वाढवावी, ठाणे महापालिकेच्या टीडीआरएफप्रमाणे प्रत्येक मनपाने स्वतःचे आपत्कालीन पथक तयार करावे. स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देऊन बचवकार्यात त्यांची मदत घ्यावी, असे निर्देश अधिकारीवर्गाला या वेळी देण्यात आले.

मुंबईमध्ये एमएमआरडीए आणि इतर यंत्रणांच्या अखत्यारीत असलेल्या होर्डिंग्जना मनपाचे नियम–निकष बंधनकारक आहेत. रस्त्यावरील मॅनहोल्सना झाकण आणि गर्डर बसवावे. ४८६ ठिकाणी दरडप्रवण स्पॉट आहेत तिथे व्यवस्था करून कायमस्वरूपी व्यवस्था करण्याचे तसेच जलजन्य आजारांवर नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने औषध गोळ्या यांचा पुरेसा साठा करून ठेवावा, असेही सूचित करण्यात आले.

मध्य प्रदेशातील संजय सरोवर, कर्नाटकातील अलमट्टी धरण, तेलंगणातील मेडीगट्टा धरण यांच्याशी संपर्क राखून धोक्याची सूचना आधी मिळेल याची व्यवस्था ठेवावी तसेच नद्यांवरील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे. प्रशासन, रेल्वे, सैन्यदल, मदत पथके सगळ्यांनी एकत्र येऊन काम केल्यास यंदाचा मान्सून यशस्वीपणे पार पाडणे आपल्याला शक्य होईल, असे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या बैठकीस मदत आणि पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, जलसंधारणमंत्री संजय राठोड, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मदत आणि पुनर्वसन सचिव सोनिया सेठी, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर तसेच राज्य प्रशासनातील सर्व विभागांचे प्रधान सचिव, नौदल, पायदळ आणि हवाई दलाचे मुंबई विभागीय अधिकारी, मध्य व पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक, मुंबई मेट्रो, म्हाडा, एनडीआरएफ, एसडीआरएफचे अधिकारी, सर्व विभागाचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी केलेल्या नियोजनाबाबत अवगत केले.

# अग्रवाल पिता-पुत्राच्या पोलीस कोठडीत वाढ

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे हिट अ‍ॅण्ड रनप्रकरणी अल्पवयीन आरोपी मुलाचे वडील आणि पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल तसेच आजोबा सुरेंद्र कुमार अग्रवाल यांना आणखी चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आता दोघेही ३१ मेपर्यंत पोलीस कोठडीत असणार आहेत.



पुणे हिट अ‍ॅण्ड रन प्रकरण

कार अपघातप्रकरणी सुरेंद्रकुमार आणि विशाल अग्रवालला मंगळवारी (दि. २८) न्यायालयात हजर करण्यात आले होते. चालकाचे अपहरण, मुलाचा गुन्हा स्वतःवर घ्यावा आणि तसे न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी कोर्टामध्ये सुनावणी झाली.

कोर्टामध्ये सरकारी वकील आणि बचाव पक्षाचे वकील यांच्यामध्ये खडाजंगी झाली. उर्वरित प्रकरणात आणखी लोक सामिल असण्याचा संशय व्यक्त करीत त्याचा तपास करण्याची गरज असल्याचा युक्तिवाद या वेळी सरकारी वकिलांनी केला. त्याचबरोबर ड्रायव्हरचा मोबाईल हस्तगत करायचा आहे व घरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये नेमकी छेडछाड कोणी केली याच्या तपासासाठी आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने आरोपी सुरेंद्रकुमार आणि विशाल अग्रवाल यांना एकत्रित चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# शिव्या देणे, अपशब्द वापरणे विरोधकांच्या स्वभावाचा भाग

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

निवडणूक असो अथवा नसो या विरोधकांना असे वाटते की, शिव्या देण्याचा अधिकार केवळ त्यांनाच आहे. ते लोक इतके हताश आणि निराश झालेत की शिव्या देणे, अपशब्द वापरणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग झाला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांवर हल्लाबोल केला आहे. एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसवर हल्लाबोल केला.



यंदाच्या लोकसभा निवडणुकीत वैयक्तिक पातळीवर टीका झाली. त्यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, मी इतकेच सांगेन की, गेल्या २४ वर्षांपासून शिव्या खाऊन, खाऊन 'गाली प्रूफ' (शिव्यांनी काही फरक पडत नाही) झालोय. काही जण मला 'मौत का सौदागर' म्हणायचे, 'गंदी नाली का किडा' म्हणायचे. एकदा संसदेत मला इतक्या शिव्या दिल्या गेल्या की, माझे एक मित्र शिव्या मोजत होते. तेव्हा मला १०१ शिव्या दिल्या होत्या, पण विरोधकांनी शिव्या दिल्याने मला काहीच फरक पडत नाही.

पंतप्रधान मोदींनी पुढे सांगितले की, इंडिया आघाडीवाल्या लोकांनी जिथे त्यांची सत्ता आली तिथे रातोरात दरोडा टाकून ओबीसींचे आरक्षण हिरावले. या लोकांनी मुस्लिम समाजातील विविध जातींचा ओबीसीत समावेश केला आणि ओबीसींचे आरक्षण त्यांना लागू केले. त्यांनी दरोडा टाकून ओबीसींचे अधिकार हिसकावले.

# पालघर स्थानकात मालगाडी घसरली

**पालघर : प्रतिनिधी**

मुंबईकडे जाणाऱ्या मालगाडीचे शेवटचे सहा डब्बे पालघर येथे रूळावरून घसरले. हा अपघात मंगळवारी (दि. २८) संध्याकाळी ५ वाजता घडला.



गार्डसह शेवटचे सहा डब्बे रूळावरून घसरले आणि ते २ व ४ क्रमांकांच्या रूळावर आले. या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही, मात्र मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली. यानंतर रूळावरील डब्बे हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. दरम्यान, मुंबईहून पालघरच्या दिशेने येणारी वाहतूक मात्र धीम्या गतीने सुरू होती.

# पुण्यात आणखी एक भयंकर अपघात; भरधाव ट्रकने दोन तरुणांना चिरडले

**पुणे** : कल्याणीनगर अपघातानंतर पुण्यात दुसरा मोठा अपघात नगर रस्त्यावर खराडी जुना जकात नाका येथे घडला. भरधाव ट्रकने सोमवारी (दि. २७) रात्री १०च्या सुमारास दुचाकीवरील दोन महाविद्यालयीन तरुणांना धडक दिली. यात आदिल शेख आणि त्याच्या मित्राचा मृत्यू झाला आहे.

अपघातात मृत्युमुखी पडलेले तरुण वाघोली येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. ते मूळचे लातूर येथील उदगीरचे आहेत. अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मालवाहतूक करणारा ट्रक वाघोलीतून पुण्याकडे येत असताना खराडी जुना जकात नाका येथे अपघात झाला. या प्रकरणी ट्रकचालकाला ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. श्यामबाबू रामफळ गौतम असे चालकाचे नाव आहे. ट्रकचालक वाघोलीहून चंदननगरकडे जात होता. जकात नाका येथे सिग्नलवर थांबलेल्या दुचाकीला ट्रकने मागून जोरात धडक दिली. त्यामध्ये दुचाकीवर असणारे तीन जण फरफटत गेले. अपघातात दोघांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

## निवडक

### मिझोराममध्ये दगडखाणीत भूस्खलन; १० मजुरांचा मृत्यू

**आइजोल** : रेमल चक्रीवादळाचा फटका पश्चिम बंगालसह ईशान्य भारतातील मिझोराम राज्यालाही बसला आहे. मिझोरामची राजधानी आयझोलमध्ये मंगळवारी (दि. २८) सकाळी ६च्या सुमारास मेल्थम आणि हिमेनच्या सीमेवर एका दगडाच्या खाणीत भूस्खलन झाले. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला असून दोन जणांना वाचविण्यात आले आहे. अद्याप काही मजूर या ढिगाऱ्याखाली अडकलेले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

### केजरीवालांच्या याचिकेवर तातडीच्या सुनावणीला नकार

**नवी दिल्ली** : मद्य धोरण घोटाळा प्रकरणात अंतरिम जामिनावर सध्या तुरूंगाबाहेर असलेले आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने झटका दिला आहे. केजरीवाल यांच्याकडून अंतरिम जामिनाची मुदत वैद्यकीय कारणांमुळे सात दिवसांनी वाढवून मिळण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे आता केजरीवालांना २ जून रोजी पुन्हा आत्मसमर्पण करावे लागणार आहे.

# शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई शिक्षक व पदवीधर आणि कोकण विभाग पदवीधर विधान परिषद मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. यासाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, या मतदारसंघांतील प्रशासकीय तयारी तसेच मतदारांच्या संख्येबाबत कोकण विभागीय उपायुक्त तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी मंगळवारी (दि. २८) पत्रकार परिषदेद्वारे माहिती दिली.

कोकण विभागात जिल्हास्तरावर आचारसंहिता स्थायी समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत जिल्हाधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष, माध्यम प्रमाणीकरण व देखरेख समिती व भरारी पथक स्थापन करण्यात आली आहेत. विभागीयस्तरावर २४ तास चालू असलेला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमांनी निवडणुकीबाबत जनसामान्यांमध्ये जनजागृती करावी, असे आवाहन उपायुक्त अमोल यादव यांनी या वेळी केले.

या पत्रकार परिषदेस उपायुक्त संजीव पालांडे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे उपस्थित होते.

### मतदारसंघनिहाय मतदार

मुंबई पदवीधर मतदारसंघात स्त्री ३७ हजार ६१९, तर पुरुष ५३ हजार ६४१ असे एकूण ९१ हजार २६३ मतदार आहेत. मुंबई शिक्षक स्त्री १० हजार ८४९, तर पुरुष तीन हजार ६६६ असे एकूण १४ हजार ५१५ मतदार आहेत. त्याचप्रमाणे कोकण विभाग पदवीधर मतदारसंघात स्त्री ७४ हजार ५७५, तर पुरुष एक लाख दोन हजार ४४२ असे एकूण एक लाख ७७ हजार ३२ मतदार आहेत. २८ मे रोजी नोंदणी होणाऱ्या पदवीधर मतदारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.




उरण : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. याबद्दल विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते मंगळवारी सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थेचे संचालक संजय भगत, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, रवी भोईर, मुख्याध्यापिका अनुराधा काठे व शिक्षक उपस्थित होते. (वृत्त पान ३ वर..)

जनेप प्राधिकरण JNPA
INDIA'S BEST PERFORMING PORT




२० तासांचा सर्वोत्तम टर्न अराउंड टाईम
भारतातील पहिले बंदर-आधारित विशेष आर्थिक क्षेत्र
जगातील २६ वे सर्वात मोठे कंटेनर बंदर
१००% लँडलॉर्ड असलेले भारतातील पहिले मेजर पोर्ट
वाढवण बंदर जागतिक दर्जाचे व देशातील सर्वात मोठे बंदर विकसित होत आहे

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
भरभराटीचे क्षण एकत्रित साजरे करण्याचा आनंद

JNPORT | JNPort | JNPA | JNPAPORT | JN Port
अधिक माहितीकरिता JNPA हेल्पलाईन नंबर १८०० २२८ २८२ वर कॉल करा, वेबसाईट : www.jnport.gov.in

# सरकारच्या योजनांमुळे महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची पत्रकार परिषदेत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षनेत्यांनी आरोप केला की, गेल कंपनी महाराष्ट्रातून निघून गेली, त्याला सरकार जबाबदार आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, गेल कंपनी गेली त्याचे खापर आमच्यावर फोडू नये. गेल्या दोन वर्षांत राज्य सरकारच्या योजनांमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली असल्याचे उद्योगमंत्री उदय सांत यांनी स्पष्ट केले. डोंबिवली स्फोटप्रकरणी ना. उदय सामंत यांनी मंगळवारी (दि.२८) मंत्रालयात आढावा बैठक घेतली होती. त्यानंतर पत्रकार परिषदेत माहिती दिली.



ते पुढे म्हणाले की, गेल कंपनीने महाराष्ट्र सरकारकडे परिपूर्ण प्रस्ताव दिलाच नव्हता. त्यांनी रत्नागिरीमध्ये जागा मागितली होती, त्या वेळी एमआयडीसीकडे तिकडे जागा उपलब्ध नव्हती. जेव्हा उपलब्ध झाली तेव्हा त्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना सरळ सांगितले की, रिफायनरीसाठी मागे दोन वेळा आंदोलने झाली, राजकीय दबाव टाकला. रिफायनरी पाहिजे की, नाही हे नीट सांगितले नाही. त्यामुळे त्यांनी पुढे प्रस्ताव दिलाच नाही.

राज्य सरकारने स्थानिक पातळीवरील कंपन्या, जिल्हास्तरीय कंपन्या यासाठी एक्सपान्शन आणि गुंतवणूक योजना आखली होती. त्यामुळे छत्रपती संभाजी नगर ५६८ कोटी, नाशिक ९७५ कोटी, अमरावती २२९ कोटी, नागपूर १५९ कोटी, पुणे ३०५ कोटी, कोकण ४१६ कोटी म्हणजे एकूण २६५२ कोटींचे चजण झाले आणि गुंतवणूक छत्रपती संभाजी नगर १०,३०७ कोटी, नाशिक २१,७३३ कोटी, अमरावती ३७४६ कोटी, नागपूर १७,८४८ कोटी, पुणे २१,८०६ कोटी आणि कोकण २१,५४९ कोटी म्हणजेच एकूण गुंतवणूक ९६,६८१ कोटी एवढी झाली आणि त्यामुळे २३,१,३३० रोजगार निर्मिती झालेली आहे, तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमुळे २०१९-२०२०मध्ये १२२० उद्योजक तयार झाले. २०२०-२१मध्ये ४८१२ उद्योजक, २०२१-२२मध्ये ४०९३ उद्योजक, २०२२-२३मध्ये १२,३३६ उद्योजक आणि यावर्षी १९,८०० उद्योजक म्हणजेच दोन वर्षात ३१ हजार उद्योजक तयार झाले आहेत. याचाच अर्थ मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून ९० हजार रोजगार निर्माण झाले आणि जिल्हास्तरीय दोन लाख रोजगार निर्माण झाले आहेत. त्यामुळे विरोधकांनी आकडेवारी व पेपर्स बघावे उगीच राजकारण करू नये.

मॅग्नेटिक महाराष्ट्र एक मोठा कार्यक्रम आपण ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये करतोय. त्यातूनही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल आणि त्यामुळे मोठी रोजगार निर्मिती होणार आहे, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

डोंबिवली येथे एमआयडीसीमध्ये स्फोट झाला त्यासाठी प्रधान सचिव उद्योग, प्रधान सचिव कामगार आणि प्रधान सचिव पर्यावरण यांची उच्चस्तरीय समिती नेमली आहे. ते तीन आठवड्यात अहवाल सादर करणार आहेत. ज्या कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा अनधिकृत बांधकाम केले असेल या सगळ्या बाबींचासुद्धा आढावा घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीला भेट दिली, त्या वेळी त्यांनी काही निर्देश दिले आहेत. त्याचे तंतोतंत पालन या समितीकडून आणि संबंधित अधिकारी यांच्याकडून केले जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

# अल्पवयीन आरोपीचे रक्तनमुने बदलणाऱ्या डॉक्टरांना नोटीस

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून कारवाईचे संकेत

**मुंबई : प्रतिनिधी**



पुण्यातील कल्याणी नगरमध्ये भरधाव कारने एका दुचाकीला धडक दिली होती. त्यानंतर आरोपीच्या रक्ताचे नमुने ससूनच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागातील डॉक्टरांनी बदलल्याचे सांगत पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. या प्रकरणात महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) दोन्ही डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावत त्यांच्यावर कारवाईचे संकेत दिले आहेत.

डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर अशी नोटीस बजावलेल्या दोन्ही डॉक्टरांची नावे आहेत. या घटनेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात पुणेतील ससून रुग्णालयातील दोन्ही डॉक्टरांनी आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलून दुसऱ्याचे नमुने न्यायवैद्यकशाळेत तपासणीला पाठवले होते. या वेळी दुसऱ्याच्या रक्तनमुन्याच्या अहवालावर आरोपीचे नाव लिहिण्यात आले होते. या गंभीर प्रकरणाची स्वत:हून दखल घेत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) दोन्ही डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

उत्तरासाठी सात दिवसांचा कालावधी दिला गेला आहे. त्यांच्या उत्तरानंतर एमएमसीमधील तज्ज्ञांची समिती या प्रकरणाची आणखी चौकशी करेल. त्यात डॉक्टर दोषी आढळल्यास त्यांची नोंदणी कायमची रद्द करण्याचे अधिकारही एमएमसीला आहेत.

> **डॉक्टरांवरील आरोप बघता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने स्वत:हून दोन्ही डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. दोघांच्या उत्तरानंतर त्यांची चौकशी केली जाईल.**
>
> **-डॉ. विंकी रुघवाणी, प्रशासक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई**

# जासई विद्यालयातील विद्यार्थ्यांचे दहावीत सुयश

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई विद्यालयाचा इयत्ता दहावीचा गुरुकल व सेमी इंग्रजीचा निकाल १०० टक्के व विद्यालयाचा निकाल ९७.४३ टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयातील ओम झिमल ९३.४० टक्के प्रथम, पार्थ ठाकूर ९२.८० टक्के द्वितीय, प्रणिता काळे ९१.८० टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. हे तिनही विद्यार्थी तालुक्यातही अव्वल ठरले आहेत.



शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील, महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक आणि दि रयत सेवक को. ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन नुरा शेख, डी. पी. सोनावणे, मनमोहन महाराज, डी. बी. म्हात्रे, लेखनिक डी. के. पाटील, एस. एम. ठाकूर यांनी प्राचार्य अरुण घाग यांचे अभिनंदन केले.

# गडचिरोलीत जहाल नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण




**गडचिरोली : प्रतिनिधी**

छत्तीसगड राज्यातील विविध चकमकींमध्ये सहभागी असलेल्या एका जहाल नक्षल्याने मंगळवारी (दि.२८) गडचिरोली येथे केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. गणेश गट्टा पुनेम (वय ३५) असे आत्मसमर्पित नक्षल्याचे नाव असून, तो छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील बेचापाल येथील रहिवासी आहे.

गणेश पुनेम हा २०१७मध्ये छत्तीसगड राज्यातील भैरमगड भागातील नक्षल्यांच्या पुरवठा समितीत सहभागी झाला. २०१८पर्यंत तो या समितीचा उपकमांडर होता. २०१७मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२मध्ये तिम्मेनार येथे झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर सहा लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. मंगळवारी गणेश पुनेम याने केंद्रीय राखीव दलाचे पोलीस उपमहानिरीक्षक जगदीश मीणा यांच्यापुढे आत्मसमर्पण केले. त्यानंतर त्याला गडचिरोली जिल्हा पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले.

या वेळी केंद्रीय राखीव दलाचे उप कमांडंट नितीन कुमार उपस्थित होते. २०२२पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे.

# कोस्टल रोड टनेलच्या कायमस्वरुपी दुरूस्तीचे मुख्यमंत्र्यांकडून आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या कोस्टल रोडच्या टनेलमध्ये गळती सुरू झाल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाला. या घटनेची थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत मंगळवारी (दि.२८)पाहणी केली आणि महापालिका अधिकाऱ्यांना तातडीने दुरूस्तीचे आदेश दिले. महापालिका अधिकाऱ्यांनी एका रात्रीत संबंधित जागेवर डागडुजी करून गळती थांबवली आहे.

मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाचा पहिला टप्पा ११ मार्च रोजी मुंबईकरांसाठी खुला करण्यात आला. पहिल्या टप्प्यात वरळी ते मरिन ड्राईव्ह या ११ किमीच्या पट्ट्यात २.०७ किमी लांबीचा टनेलही सेवेत आल्यामुळे प्रवासही सुसाट होत आहे, पण याच टनेलमध्ये पाणी गळती होत असल्याचा



व्हिडिओ सोमवारपासून व्हायरल झाला. यानंतर खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची दखल घेत माहिती घेतली, तसेच मनपा अधिकारी आणि एलएनटीच्या अधिकाऱ्यांनी गळतीच्या ठिकाणाची पाहणी केली. मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापनेसंदर्भात बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोस्टल रोड टनेलच्या गळतीबाबतची माहिती दिली.

कोस्टलच्या टनेलमध्ये होणाऱ्या गळतीबाबत मी माहिती घेतली. मनपा आयुक्तांशी बोललो. टनेलच्या ग्राऊटींगमध्ये काही लिकेज आहेत. मुख्य बांधकामात कोणतीही गळती नाही. मूळ संरचनेला कोणताही धोका नाही. तिथे मनपा अधिकारी अमित सैनी, एलएनटीची टीमदेखील पाहणीला गेली होती. आताही सर्व तज्ज्ञ मंडळी तिथे आहेत. जी काही दुरूस्ती करायची आहे ती कायमस्वरूपी असली पाहिजे. तात्पुरती असता कामा नये, असे आदेश मी दिले आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# पेणच्या श्रीमती सुमतीबाई देव विद्यालयाचा निकाल १०० टक्के

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील श्रीमती सुमतीबाई देव माध्यमिक विद्यालयाचा एसएससीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये पार्थ पडळकर ९७.२० टक्के प्रथम, संस्कार धनावडे ९१.८० टक्के द्वितीय तर ऋतुराज डंगर ९०.६० टक्के मिळवून तृतीय आला आहे.

परीक्षेला एकूण ७२ विद्यार्थी बसले होते. त्यात विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी ४० विद्यार्थी, प्रथम श्रेणी २३ आणि द्वितीय श्रेणी नऊ असे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्ष सुहासिनी देव, संचालक मंडळ, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षकांनी अभिनंदन केले आहे. यासह पेण प्रायव्हेट हायस्कूल ९८.३१ टक्के, सौ. म.ना.ने.ने. विद्यालय ९८.१३ टक्के, सार्वजनिक विद्यामंदिर अँड ज्युनिअर कॉलेज ९७.१४ टक्के, केईएस इंग्लिश मीडियम स्कूल ९७.७९ टक्के, वडखळ येथील जय किसान विद्यामंदिर ९५.८३ टक्के, कै.पू.न. गोडसे विद्यामंदिर वरसई ८६.२० टक्के, श्री गो.ना.म्हात्रे विद्यालय भाल १०० टक्के, पी.इ.एस. इंग्लिश मीडियम स्कूलचा १०० टक्के निकाल लागला.


# कोकण रेल्वेमार्गावर मेगाब्लॉक; ट्रेनच्या वेळापत्रकात बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेवर मध्य रेल्वेकडून शुक्रवारी (दि.३१) ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे.

पायाभूत कामांसाठी मध्य रेल्वेवरील सीएसएमटी येथे ब्लॉक सुरू आहे. कोकण रेल्वेवरील रत्नागिरी- वैभववाडी रोडदरम्यान देखभाल-दुरूस्तीच्या कामासाठी शुक्रवारी सकाळी ९.१० ते सकाळी ११.४० वा.पर्यंत ब्लॉक घेतला आहे. या वेळी सावंतवाडी रोड ते दिवा एक्स्प्रेस सावंतवाडी रोड ते वैभववाडी रोडदरम्यान ८० मिनिटे थांबा घेईल, तसेच सीएसएमटी-मडगाव जनशताब्दी एक्स्प्रेस चिपळूण ते रत्नागिरीदरम्यान ४० मिनिटे थांबा घेईल. सीएसएमटी ते मडगाव तेजस एक्स्प्रेस रत्नागिरीदरम्यान २० मिनिटांचा थांबा घेईल. यांसह डाऊन मंगला लक्षद्वीप एक्स्प्रेससह मुंबईकडे येणाऱ्या अप रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात बदल होईल.

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथील फलाट क्रमांक १०/११च्या विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. यासाठीच २३ मे ते ३१ मेपर्यंत दररोज १२.३० ते ४.३० वा. पर्यंत चार तासांचा ब्लॉक घेण्यात येत आहे. या ब्लॉकमुळे मुंबई-पुणे प्रगती, इंटरसिटी आणि मुंबई ते शिर्डी वंदे भारत रद्द होणार आहेत.



# फ्लडगेज ठरवणार रेल्वे वाहतुकीची दिशा

## पश्चिम रेल्वेवर २४ फ्लडगेजची उभारणी पूर्ण




**मुंबई : प्रतिनिधी**

मुसळधार पावसात रेल्वे रुळांवर पाणी साचल्यास लोकल वाहतूक खोळंबते. त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. हा त्रास टाळण्यासाठी पश्चिम रेल्वेने मुंबई विभागात ३६ फ्लडगेज बसवण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी २४ फ्लडगेजची उभारणी पूर्ण झाली असून उर्वरित फ्लडगेज येत्या आठवड्यात उभारण्यात येणार आहेत.

अत्यंत मुसळधार पाऊस आणि समुद्रात भरती या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्यास शहरातील रस्ते आणि रेल्वेमार्ग पाण्याखाली जातात. रेल्वेमार्गावर पाणी आल्यास त्याची पातळी मोजण्यासाठी फ्लडगेजचा वापर होतो. फ्लडगेजमध्ये पाण्याचे विविध स्तर दर्शविलेले असतात. पाण्याची पातळी ठराविक स्तराच्या वर गेल्यास सुरक्षिततेचा उपाय म्हणून रेल्वे वाहतूक बंद करण्यात येते.

पश्चिम रेल्वेवरील मुंबई विभागात दादरमध्ये २० फ्लडगेज बसवण्यात येणार असून त्यापैकी ४० टक्के काम पूर्ण झाले असून आठ फ्लडगेज उभारण्यात आले आहेत. उर्वरित १२ ठिकाणी फ्लडगेजचे काम येत्या आठवड्यात पूर्ण करण्यात येणार आहे. अंधेरी, बोरिवली आणि भाईंदरमधील फ्लडगेज उभारण्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून तिन्ही स्थानकांच्या परिसरात एकूण १६ फ्लडगेज उभारण्यात आले आहेत, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

रेल्वेरुळांच्या वर १५० मिमी एवढ्या उंचीपर्यंत पुराच्या पाण्याची पातळी गेल्यास खबरदारी म्हणून सर्व रेल्वे वाहतूक थांबवण्यात येते, तर त्यापेक्षा कमी पाणी पातळी असेल, तर पातळीनुसार गाड्यांचा वेग निश्चित केला जातो.

# मेजर राधिका सेन यांना मिळणार संयुक्त राष्ट्रसंघाचा प्रतिष्ठित पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या मेजर राधिका सेन यांना संयुक्त राष्ट्र संघाचा प्रतिष्ठित पुरस्कार दिला जाणार आहे. त्या काँगोमधील संयुक्त राष्ट्र मिशनमध्ये सेवा बजावत आहेत. भारतीय महिला शांती सैनिक मेजर राधिका सेन यांना प्रतिष्ठित मिलिटरी जेंडर ॲडव्होकेट पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व भारतीयांसाठी ही कौतुकास्पद बाब आहे. खरी लीडर आणि आदर्श या शब्दांत यूएनचे प्रमुख अँटोनियो गुटेरेस यांनी राधिका यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.



राधिका सेन यांचा जन्म १९९३मध्ये हिमाचल प्रदेशमध्ये झाला. मेजर राधिका आठ वर्षांपूर्वी भारतीय लष्करात दाखल झाल्या होत्या. त्यांनी बायोटेक अभियांत्रिकीमध्ये पदवी पूर्ण केली. यानंतर आयआयटी मुंबईतून पदव्युत्तर पदवी घेतली. पुढे सशस्त्र दलात सामील होण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

मार्च २०२३मध्ये इंडियन रॅपिड डिप्लॉयमेंट बटालियनसोबत काँगोमध्ये त्यांना तैनात करण्यात आले.

एप्रिल २०२४मध्ये त्यांचा कार्यकाळ पूर्ण होणार आहे. यापूर्वी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मेजर सुमन गवानी यांना देण्यात आला होता. मेजर सुमन यांनी दक्षिण सुदानमध्ये संयुक्त राष्ट्र मिशनमध्ये काम केले आणि त्यांना २०१९मध्ये हा सन्मान देण्यात आला.

# दोन सख्ख्या बहिणींसह तिघांचा बुडून मृत्यू

**नांदेड :** पोहण्याचा आनंद घेण्यासाठी नदीत उतरलेल्या दोन सख्ख्या बहिणींसह अन्य एका मुलीला जीवावर बेतले. आई-वडिलांच्या डोळ्यासमोर दोघांचा नदीत बुडून मृत्यू झाला.

सोमवारी दुपारी किनवट तालुक्यात ही घटना घडली. ममता शेख जावेद (वय २१), पायल देविदास कांबळे (वय १६) आणि स्वाती देविदास कांबळे (वय १३) अशी मृत मुलींची नावे आहेत. आपल्या डोळ्यादेखत मुलींचा मृत्यू झाल्याने आई-वडिलांनी हंबरडा फोडला. दरम्यान, या प्रकरणी किनवट पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## निवडक

### कामोठ्यात सहा लाखांची घरफोडी

**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील सेक्टर १९ येथील साईकिरण सोसायटीमध्ये सोमवारी दुपारी तब्बल सहा लाख रुपयांची घरफोडी झाली आहे. या घटनेनंतर पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. कामोठे येथील सेक्टर १९ मधील साईकिरण सोसायटीमधील सदनिका क्रमांक २०३ मध्ये ३४ वर्षीय सुमित शिंदे राहतात. शिंदे हे सोमवारी सकाळी अकरा वाजल्यापासून ते रात्री आठ वाजेपर्यंत घराबाहेर असताना ही चोरी झाली. चोरट्यांनी शिंदे यांच्या घराचे कुलूप कशाने तरी उघडून ही चोरी केल्याने पोलीसांना दिलेल्या तक्रारीत शिंदे यांनी म्हटले आहे. या चोरीत चोरट्यांनी १२० ग्रॅमचे सोन्याचे दागिने चोरले.

### करंजाडे येथून महिला बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरात कोणास काही एक न सांगता एक २९ वर्षीय महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कल्पना रवि पुजारी (रा. करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची पाच फुट दोन इंच, डोक्याचे केस काळे वाढलेले, डोळे काळे असून अंगात राखाडी मॅक्सी, पायात चप्पल, गळ्यात बाजारी मंगळसुत्र, कानात बाजारी रिंग, नाकात नथनी असून तिच्या उजव्या हातावर कांतू असे इंग्रजी अक्षरात गोंदलेले आहे. तिला कन्नड, हिंदी, मराठी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक अतुल देवकर (८१६९४०६०६९) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उसर्ली खुर्द येथे विवाहितेची आत्महत्या

**पनवेल :** एका विवाहितेने राहत्या घरात अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उसर्ली खुर्द गावाच्या हद्दीत घडली आहे. निळकंठ विश्वजीत या सोसायटीमध्ये राहणाऱ्या एका विवाहितेने घरात कोणी नसताना बेडरुममधील छताला असलेल्या पंख्याला गळफास घेऊन अज्ञात कारणावरून आत्महत्या केली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

### पार्क केलेल्या दुचाकीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन जवळील परिसरात उभी करून ठेवलेली ॲक्टीव्हा दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. अविनाश यादव यांनी रेल्वे स्टेशनजवळील बस स्टॅण्ड येथील सिडको पार्कींगच्या पलीकडील रोडवर उभी करून ठेवलेली ॲक्टीव्हा दुचाकी (एमएच-४६-बीटी-३४७६) ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**पनवेल :** येथील महापालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि. २८) स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मारुती गायकवाड, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सामान्य विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते.



# हवेतील प्रदूषणाबाबत दक्षता

## पनवेल मनपाकडून उपाययोजनांसाठी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



गेल्या काही दिवसांपासून एमएमआर परिसरातील हवेची गुणवत्ता बिघडल्याने मा.उच्च न्यायालयाने सुमोटो जनहित याचिका दाखल केली आहे. यामधील सुनावणीदरम्यान हवेतील प्रदूषण कमी करणे कामी मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रभावी उपाययोजना अमंलबजावणी करण्याकरिता पनवेल महापालिकेचे प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनुसार पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील संबधित विभागासोबत मंगळवारी (दि. २८) मुख्यालयात बैठक घेण्यात आली.

या वेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतुक सुनिल बोंडे, सहाय्यक निरीक्षक वाहतूक नरेंद्र औंटी, एसटी महामंडळाचे अधिकारी ज्ञानेश्वर म्हात्रे, पोलीस निरीक्षक मनोज महाडिक, घनकचरा व स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार हवेतील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने नोव्हेंबर महिन्यामध्ये मुंबई शहरात जाणाऱ्या वाहनांच्या टायरवरील धूळ कमी करण्याच्या दृष्टीने खारघर टोलनाक्यावर फवारे बसविण्याचा अभिनव उपक्रम राबविला होता. तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम क्षेत्रांना उंच कंपाऊंड घालणे, ड्रे बिज वाहतुकीच्या ट्रकवरती कापड झाकणे अशा विविध उपाययोजना अमंलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. यानंतर आता एमएमआर क्षेत्रातील प्रदूषण कमी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने संबधित पोलिस विभाग, वाहतुक विभाग, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, एसटी महामंडळ, महाराष्ट्र राज्य् प्रदूषण मंडळ अशा विविध विभागातील निर्णयक्षम अधिकाऱ्यांची समिती बनविण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानूसार आज या विविध विभागातील अधिकाऱ्यांची बैठक आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयात घेण्यात आली. या वेळी हवेतील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांवरती चर्चा करण्यात आली.

हवेतील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने संबधित विभागातील अधिकाऱ्यांची समिती बनविल्यानंतर प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यांबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.

या समितीच्या माध्यमातून कामाचा आराखडा आखणे, पथक निमिर्ती करणे, वॉर रूम तयार करणे, दंडाची निश्चिती करणे अशा विविध विषयांवरती संबधित विभागातील अधिकाऱ्यांनी आपली मते मांडली. येत्या काही दिवसातच ही समिती बनवून त्यानूसार हवेतील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने कामकाजास सुरूवात करण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

## उरणमध्ये सॅन्डविचचे दुकान जळून खाक

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील कोप्रोली नाक्याजवळ असलेल्या गुप्ता सॅन्डविचच्या दुकानाला मंगळवारी (दि. २८) दुपारी २ च्या सुमारास अचानक आग लागली. दुकानातून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडू लागले. अचानक आग लागली व आगीच्या ज्वाला भडकू लागल्या.

संबंधित घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे कर्मचारी अधिकारी घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. घटना शॉर्ट सर्किटमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेत एका सिलेंडरचा स्टोटदेखील झाला आहे. दुकानात असलेली इलेक्ट्रिक उपकरणे, विविध सामान, वस्तू, अन्न पदार्थ, मशीन, फ्रीज, फॅन, बसण्याचे खुर्च्या टेबल आदी वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. किमान अडीच लाखाहून अधिक किंमतीच्या मालाचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**“आम्ही नेहमी मोऱ्यावरून कोप्रोली येथे धंद्यासाठी येत असतो. दुकान भाड्याने घेतले आहे. सॅन्डविच, आईस्क्रीम, ज्यूस तसेच इतर पदार्थ बनवून विकत असतो. दुकानात वायरच्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागली आहे. अंदाजे अडीच लाखहुन जास्त किंमतीचे नुकसान झाले आहे. आमची परिस्थिती गरिबीची असून आमच्यावर खूप मोठे संकट कोसळले आहे.**

**-गोविंद गुप्ता, सॅन्डविच दुकानचालक, कोप्रोली नाका, उरण**

## दहावीच्या परीक्षेत बीसीटी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विद्यालयाचा इयत्ता दहावीचा १०० टक्के निकाल लागला. एकूण ७६ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी विशेष प्रावीण्य मिळवून २९ प्रथम श्रेणीत, तर तीन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

यामध्ये आस्था प्रताप मोकाशी ९५ टक्के प्रथम, सारा विजय भगत ९२ टक्के द्वितीय, पायल अनिल घरत व आर्जु निहालासिंग पटेल या दोघांनी ८८.८० टक्के तृतीय क्रमांक पटकावला. कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २८) यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, रवी भोईर, मुख्याध्यापिका अनुराधा काठे व इतर शाळांचे प्रतिनिधी, शिक्षक उपस्थित होते. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षक, मुख्याध्यापिका यांचेही कौतुक व अभिनंदन केले. सर्व यशस्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव एस.टी. गडदे यांनीही अभिनंदन केले.



**पनवेल : शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, अमित ओझे, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, माधुरी गोसावी, संजय कदम, महेंद्र गोडबोले, तेजस वाडकर, सुशांत पाटणकर, विनिता जोशी, सुनील भगत, योगेश रानडे, दीपक झेले, अभिषेक पटवर्धन, मनोहर लिमये, संजय गडगे आदींनी अभिवादन केले.**

## उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे दहावीमध्ये १०० टक्के यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचा एसएससी बोर्डाचा निकाल १०० टक्के लावून विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

या विद्यालयातील एकूण ५६ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी कोमल उमाकांत इरळे या विद्यार्थीनीने ८९.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, झुंजारराव मानसी लक्ष्मण हीने ८८.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर रोकडे गायत्री समाधान हीने ८३.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.फ

विद्यालयातील ५६ विद्यार्थ्यांपैकी नऊ विद्यार्थी विशेष प्राविण्याने २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीने तर २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीने पास झाले. उत्तीर्ण झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, तसेच स्कूल कमिटी, मुख्याध्यापक डी.जी.हजारे व सर्व शिक्षकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दहावीच्या वर्गशिक्षिका सौ.पाटील, सौ. ज्योत्स्ना ठाकूर, सौ.पवार, सौ.गावंड, सौ.म्हात्रे व मुख्याध्यापक यांचेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

## ओवेपेठच्या रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के


**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सोफिया शेख ८८.४० %



सलोनी ठाकूर ८५.४० %



रोशनी महतो ८४.२० %


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल १००टक्के लागला आहे.

दहावीच्या परिक्षेसाठी विद्यालयातून ३० विद्यार्थी बसले होते. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तीन विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी प्राप्त केली आहे. यामध्ये प्रथम क्रमांक सोफिया सरफराज शेख हिने ८८.४० टक्के प्राप्त करून मिळविला आहे. द्वितीय क्रमांक सलोनी प्रदीप ठाकूर हिने ८५.४० टक्के प्राप्त करून मिळविला आहे तर तृतीय क्रमांक रोशनी विनय महतो हिने ८४.२० टक्के प्राप्त करून मिळविला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव डॉ. श्री. एस. टी. गडदे तसेच संस्थेचे कार्यकारिणी मंडळाचे सर्व सदस्य, रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक खांदेकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## ‘त्या’ बालकांच्या नातेवाईकांनी संपर्क साधण्याचे आवाहन








**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बालग्राम महाराष्ट्र, संचलित पंचदीप संकुल येथे बालकांना काळजी व संरक्षणासाठी दाखल करण्यात आले आहेत.

गौरी जानू पवार (वय ८) व मधुरा जानू पवार (वय १० ) (दोन सख्ख्या बहिणी), शाबीर शेख (वय ९) व अब्दुल शेख (वय ६) (दोन सख्खे भाऊ), प्रतिक धर्मा पाळमेळ (वय ९) सचिन मनोज गायकवाड (वय १५) अशी या मुलांची नावे आहेत.

या सहा बालकांचे पालक व नातेवाईकांनी हे वृत्त प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत बालग्राम महाराष्ट्र, संचलित पंचदीप संकुल (९८२३७०२२९७)वर संपर्क साधावा; अन्यथा बालकांची जबाबदारी घेण्यास कोणीही नाही, असे समजून बालकल्याण समिती, रायगड यांच्यामार्फत बालकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात येईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

**संपर्कासाठी पत्ता**

**बालग्राम महाराष्ट्र, संचलित पंचदीप संकुल, से-१२, प्लॉट नं-०६, खांदा कॉलनी, उघढ कॉलेज समोर, पनवेल, जि. रायगड (९८२३७०२२९७), जिल्हा महिला व बालविकास विभाग, अलिबाग रायगड (७७७५०१८१९७).**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर स्पोर्ट्स अकॅडमी व युवा प्रेरणा सामाजिक संस्था यांच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक तसेच क्रीडाविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस २ जून रोजी असून या निमित्ताने खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने रविवारी (दि. २) संध्याकाळी ५ वा. भव्य अशा फर्स्ट टॉप रँकिंग ओपन रोड रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपचे आयोजन सेक्टर १४ खारघर गाव मेट्रो स्टेशनच्या बाजूला करण्यात आलेले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्याच वेळेस खारघर शहरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. जवळपास २०० खेळाडू या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत असे खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण पाटील व प्रशिक्षक (कोच) मोहम्मद सियाद यांनी सांगितले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची समाजाप्रती असलेली बांधिलकी व पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना दिलेली शिकवण म्हणजे समाजासाठी काहीतरी उपयुक्त असे कार्यक्रम घेऊन वाढदिवस साजरा करावा व त्याचाच एक भाग म्हणून आधार कार्डमधील दुरुस्ती, अपडेट असतील तसेच नवजात बालकांसाठी मोफत आधार कार्ड शिबिराचे आयोजन शनिवार व रविवार (१ व २ जून) सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत, खारघर सेक्टर १९ ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्लॉट नंबर ५९ या ठिकाणी करण्यात आलेले आहे.

खारघरच्या नागरिकांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन युवाप्रेरणा सामाजिक संस्थेच्या सचिव व माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी केलेले आहे.

## न्हावे विद्यालयात एसएससी गुणवंतांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यालय व स्थानिक शाळा समितीच्या वतीने करण्यात गौरव करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षा मार्च २०२४चा विद्यालयाचा शेकडा निकाल ९५.८३ टक्के लागला असून प्राजक्ता विजय पांचाळ हिने ७४.२० टक्के इतके गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला तर नम्रता अकाराम कोळेकर ह्या विद्यार्थीनीने ७२ टक्के इतके गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला तर निशिता महेश दिक्षीत हिला ६९.८० गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक संपादित केला.

बोर्ड परीक्षा मार्च २०२४साठी विद्यालयातील २४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाच्या एकूण निकाल ९५.८३ टक्के इतका लागला असून सर्व गुणवंतांचा सर्वत्र अभिनंदन होत आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थीनींचा सन्मान करून अभिनंदन करण्यात आले. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर, स्थानिक शाळा समितीचे सदस्य किसन पाटील, न्हावा सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करून त्यांचे अभिनंदन केले. या वेळी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक तथा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांचेसह ज्येष्ठ शिक्षिका कुसुम ठोंबरे व प्रसन्न ठाकूर यांचेही त्यांनी विशेष कौतुक केले.

## संपादकीय

# शंभर टक्क्यांचा बोलबाला!

राज्यातील दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा टक्का वाढला ही आनंदाची बाब आहेच. इतरही अनेक लक्षवेधी बाबी याही वर्षी या परीक्षेच्या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. शालेय शिक्षण सर्वच स्तरांतील विद्यार्थ्यांसाठी अधिकाधिक फलदायी आणि प्रगतीच्या वाटेवर नेणारे ठरावे यासाठी यातील काही बाबींचा सुयोग्य विचार संबंधितांनी करणे योग्य ठरेल.

**दहावीच्या निकालाच्या आधारे शालेय विद्यार्थी पुढील शैक्षणिक वाटचालीची व त्याकरिता महाविद्यालयाची निवड करणार असल्याने या निकालाला कायमच विद्यार्थी, पालक व शिक्षकांकडूनही मोठे महत्त्व दिले जाते. दहावीच्या परीक्षेचा निकाल यंदा मे महिन्यातच जाहीर झाला, त्यात कुठल्याही तऱ्हेचा विलंब झाला नाही ही सर्व संबंधितांसाठी कितीतरी आनंदाची आणि दिलासादायक बाब आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात दहावीचा निकाल मे महिन्यात जाहीर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. स्वाभाविकपणे यामुळे अकरावीचे प्रवेश वेळेत पार पडून पुढील शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होऊ शकेल. राज्यात एकंदरीतच गेल्या वर्षीच्या तुलनेत उत्तीर्णांचा टक्का वाढला असून मुंबई विभागाचा निकालही गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक चांगला लागला आहे. मुंबई विभागातील ९५.८३ टक्के विद्यार्थी यंदा उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षी हे प्रमाण ९३.६६ टक्के होते. मुंबई विभागात यंदाही रायगड जिल्ह्याने बाजी मारली असून जिल्ह्यातील सर्वाधिक ९६.७५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मागील वर्षी हे प्रमाण ९५.२८ टक्के होते. राज्यात दहावीच्या निकालात १०० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. मुंबई विभागात आठ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले तर संपूर्ण राज्यात १८७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत. यापैकी १२३ विद्यार्थी एकट्या लातूर विभागातील आहेत. त्यामुळे गुणवाढीच्या 'लातूर पॅटर्न'ची चर्चा पुन्हा एकवार होते आहे. यात लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे राज्यभरातून तब्बल १.८ लाख विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमबाह्य उपक्रमांसाठीचे अतिरिक्त गुण मिळाले आहेत. यापैकी जवळपास १.३ लाख मुलांना चित्रकलेसाठी हे गुण मिळाले तर ३२ हजार ९६३ विद्यार्थ्यांना खेळातील प्राविण्याबद्दल अतिरिक्त गुण मिळाले. या अतिरिक्त गुणांमुळेच १८७ विद्यार्थ्यांची टक्केवारी १०० टक्क्यांपर्यंत जाऊन पोहचली. चित्रकला, खेळ यांखेरीज लोककला, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन, एनसीसी, स्काऊट, गाइड आणि नाट्य या श्रेणींमधील कामगिरीकरिता अतिरिक्त गुण दिले जातात. या अतिरिक्त गुणांमुळे विद्यार्थी अभ्यासापोटी आपल्या छंदांकडे पाठ फिरवित नाहीत असे सांगितले जाते, परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल स्तरांतील विद्यार्थ्यांसाठी बहुदा या संधी उपलब्ध नसतात हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे त्यांना निव्वळ परीक्षेतील कामगिरीवरच अवलंबून राहावे लागते. अकरावी प्रवेशाच्या स्पर्धेत त्यामुळे हे विद्यार्थी मागे पडणार नाहीत या बाबीकडेही लक्ष देण्याची गरज आहे. कित्येक रात्रशाळांचाही निकाल यंदा १०० टक्के लागला हे विशेष कौतुकास्पद म्हणायला हवे. शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळा व नव्वद टक्क्यांच्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करतानाच नापास विद्यार्थी खचून जाणार नाहीत, दहावीची परीक्षा म्हणजे सर्वस्व नाही. आता पुनर्परीक्षेची संधी लगेच उपलब्ध असते आदी बाबी त्यांच्यापर्यंत पोहचवण्याची, त्यांना धीर देण्याची जबाबदारी समाज म्हणून आपणच पार पाडली पाहिजे हेही ध्यानात घेण्याची गरज आहे.**

# कोकण रेल्वेकडून रायगडकरांना योग्य सेवा अपेक्षित





**खबरबात**
**नितीन देशमुख**

कोकणची माणसे साधी भोळी, त्यांच्या काळजात भरली शहाळी म्हणतात ते खरेच आहे. कोकण रेल्वेच्या माध्यमातून रेल्वेला चांगले उत्पन्न मिळत असतानाही प्रकल्पग्रस्त रायगड जिल्ह्याला रेल्वेने सतत सापत्नभावाची वागणूक दिली आहे.

कोकण रेल्वे रायगड जिल्ह्यातून जाते. या रेल्वे प्रकल्पासाठी रायगडमधील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या, पण या रेल्वेचा फायदा मात्र रायगडवासीयांना फारसा झालाच नाही. दक्षिणेतील केरळ, तामिळनाडू आणि गोवा या राज्यांनाच याचा जास्त फायदा झाला. त्यांचा वेळ आणि पैसा वाचला. त्यांच्या राज्यात दर २० मिनिटांनी थांबणारी कोकण रेल्वे रायगडमध्ये मात्र थांबत नाही. ज्या गाड्यांना रोहा किंवा माणगाव येथे थांबा दिला आहे. त्या गाड्यांनी सकाळी मुंबईला येऊन काम आटोपून पुन्हा रात्री परत जाणे शक्य होत नाही. त्यामुळे रायगडवासीयांना लालपरी अर्थात एसटी बसचाच आधार घ्यावा लागतो.

कोकण रेल्वे प्रकल्पासाठी जागा दिली. त्या वेळी रायगडमधील शेतकऱ्याला वाटले होते की, आपण आपला शेतमाल घेऊन सकाळी मुंबईला जाऊन रात्री परत घरी येऊ पण ते स्वप्नच ठरले. त्यामुळे खड्डेमय गोवा महामार्गावरून आदळत-आपटत आपल्या शरीराच्या अनेक भागाला दुखापतग्रस्त करून किवा कायमचे अधू करून डॉक्टरची बिले मात्र तो देत आहे. त्याचवेळी कोकण रेल्वे धडधडत समोरून जाते आणि त्यातून दक्षिणेकडील माणूस आरामात प्रवास करीत असल्याचे पाहणे त्याच्या नशिबी आले आहे.

कोकण रेल्वेच्या मार्गावरून जाणाऱ्या गाड्या तोट्यात नाहीत. कोलाड स्टेशनवरून जाणाऱ्या रो-रो सर्व्हिसमुळे कोकण रेल्वेला कोट्यवधी रुपयांचा फायदा होतो. या मार्गाचे दुहेरीकरणाचे व विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आता या मार्गावरून रायगड जिल्ह्यातील लोकांना सोयिस्कर ठरतील अशा गाड्या सुरू करणे आवश्यक आहे. या गाड्या वीर किंवा माणगावाहून सोडणे आवश्यक आहे. त्यामुळे रायगडमधील श्रीवर्धन, म्हसळा, तळाबरोबरच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली आणि मंडणगड या तालुक्यातील लोकांना ही त्याचा फायदा होईल. डेमू गाडी सध्या १२ डब्यांची असून ती दिवा-रोहा चालवली जाते. ती गाडी १५ डब्यांची करून तिच्या फेऱ्या वाढवणे गरजेचे आहे. अलिबागसाठी ही आरसीएफ मार्गावरून शटलसेवा सुरू करण्याची अनेक दिवसांची मागणी आहे. याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे.

रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात साईभक्त शिर्डीला, गजानन महाराजांचे भक्त शेगावला आणि वारकरी पंढरपूर येथे जात असतात. त्यांच्या सोयीसाठी पनवेलहुन गाडी नाही. यासाठी शिर्डी आणि विदर्भात नागपूरसाठी कायमस्वरूपी गाडी पनवेल किंवा रत्नागिरीहून सोडल्यास आणि या गाड्यांना तालुक्याच्या ठिकाणी थांबा देण्यात आल्यास त्याचा फायदा रायगडवासीयांना व नोकरी, धंद्यासाठी येथे आलेल्यांना होईल. कोकण रेल्वेच्या मार्गावर रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी रेल्वे फाटक आहेत. याठिकाणी अनेक वेळा अपघात होतात. रोहा येथील फाटक उघडल्यामुळे गाड्यांना उशीर होतो. तेथील पूलाचे काम सध्या सुरू आहे. पनवेलचा भुयारी मार्ग सध्या जेएनपीटी ते वैतरणा सेक्शन फेज -२ या डबल लाईन रेल्वे मार्गाचे काम पनवेल रेल्वे स्टेशन तक्का ते विचुंबे गाव या मार्गावर सुरू असल्याने बंद करण्यात आला आहे. तो जूनच्या पहिल्या आठवड्यात सुरू होईल, असे सांगितले जाते.

गाढी नदीच्या काठावर १० कोट्यवधींपेक्षा जास्त रुपये खर्च करून हा भुयारी मार्ग बांधण्यात आला आहे. यामध्ये नवीन पनवेल बाजूला सिमेंटचे चार ब्लॉक तयार करून बसवण्यात आले आहेत. पावसात या मार्गामध्ये तांत्रिक चुका झाल्याने पाणी साचत असून वाहनचालकांना त्रास होत आहे. या मार्गाच्या दोन्ही बाजूला ब्लॉक संपतात त्या ठिकाणी मार्गातील पाणी जाण्यासाठी गटार ठेवण्यात आले आहे. या गटाराची उंची ही आतील सीमेंट ब्लॉकपेक्षा जास्त असल्याने आतमध्ये साचलेले पाणी तसेच राहत आहे. याशिवाय त्याठिकाणी वाहून येणारी माती नदीच्या पात्रात न जाता तेथील दुभाजका जवळील जाळीला अडकून राहून गटार मातीने भरून जाते. त्यामुळे वरून येणारे पाणी नवीन पनवेलकडे येण्याचा मार्ग असलेल्या ब्लॉकमध्ये जाते तेथून पाण्याचा निचरा होण्यासाठी दूसरा मार्ग नसल्याने वाहन चालकांना या पाण्यातून गाडी न्यावी लागत आहे. आतमध्ये शेवाळ झाल्याने दुचाकी वाहने घसरत आहेत. त्यातच रात्रीच्या वेळेस या मार्गात विजेची सुविधा नाही. त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

पनवेलच्या भुयारी मार्गाची उंची ७.५ फुट आहे. त्यामुळे यामधून फक्त छोट्या गाड्याच जाऊ शकतात. मिनी बस, टेम्पो किंवा ट्रक जाऊ शकत नाहीत. त्यामुळे भविष्यात उसर्ली, विचुंबे किवा नवीन पनवेलमधून बससेवा सुरू करण्यास या मार्गाचा उपयोग होणार नाही. पनवेलच्या वाढत्या शहरीकरणाचा विचार करून या मार्गातून बससेवा सुरू होईल, असा भुयारी मार्ग बनवणे आवश्यक होते. पनवेलमधील भुयारी मार्ग हा फक्त पनवेलकरांच्या सोयीसाठी बनवीत असल्याचे रेल्वे दाखवीत असली तरी रेल्वे फाटक उघडल्यामुळे रेल्वेला आपल्या अनेक गाड्यांना लिंकमध्ये थांबवावे लागते. त्यामुळे रेल्वेचे वर्षाला कोट्यवधी रुपये नुकसान होते. यासाठी खरेतर रेल्वे हा खर्च करीत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपचे सीक्रेट फीचर; कोडने 'गायब' होतील चॅट्स

व्हॉट्सअ‍ॅप सिक्रेट कोड हे एक असंच भन्नाट फीचर आहे. ज्याचा वापर करून तुम्ही तुमचे चॅट हाईड म्हणजेच लपवू शकता.



इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सअ‍ॅपवर अनेक फीचर्स मिळतात. काही धमाकेदार फीचर्सबाबत खूप कमी लोकांना माहिती आहे. अशाच एका महत्त्वाच्या फीचरबाबत जाणून घेऊया...

व्हॉट्सअ‍ॅप सिक्रेट कोड हे एक असंच भन्नाट फीचर आहे. ज्याचा वापर करून तुम्ही तुमचं चॅट हाईड म्हणजेच लपवू शकता. सीक्रेट कोडशिवाय कोणीही तुमचं चॅट एक्सेस करू शकणार नाही. हे फीचर चॅट लॉकचं एक्सटेंडेड व्हर्जन आहे. ते वापरण्यासाठी, सर्वप्रथम तुम्हाला चॅट लॉक वापरावे लागेल आणि नंतर ते लॉक केलेलं चॅट्स सीक्रेट कोडसह हाईड करावे लागेल.


व्हॉट्सअ‍ॅपने गेल्या वर्षी हे फीचर जारी केले होते. चॅट लॉक करण्यासाठी, तुम्हाला ते लॉँग प्रेस करावे लागेल. यानंतर तुम्हाला वरच्या उजव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या तीन डॉट्सवर क्लिक करावं लागेल. येथे तुम्हाला लॉक चॅटचा पर्याय मिळेल, त्यावर क्लिक करावं लागेल.

आता तुम्हाला उेपींळर्पीश वर क्लिक करावं लागेल. यानंतर, फेस लॉक किंवा फिंगरप्रिंट वापरून सिस्टम ऑथेंटिकेशन पूर्ण करावे लागेल. लॉक्ड चॅट बटणावर क्लिक करून तुम्ही हे चॅट्स एक्सेस करू शकता. येथे युजर्सना सीक्रेट कोड सेट करण्याचा पर्यायदेखील मिळेल.

हा कोड तुमच्या डिव्हाइस पिनपेक्षा वेगळा असेल आणि तुम्हाला तो मॅन्युअली सेट करावा लागेल. सीक्रेट कोड सेट करण्यासाठी, तुम्हाला लॉक केलेल्या चॅट विंडोवर जावे लागेल. यानंतर तुम्हाला सिक्रेट कोडवर क्लिक करावे लागेल. तुम्हाला एक कोड तयार करावा लागेल. हा कोड कोणताही इमोजी, शब्द किंवा नंबर असू शकतो. कोड क्रिएट केल्यानंतर, तुम्हाला जघ वर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्ही या कोडद्वारेच हाईड केलेले चॅट शोधू शकता.

दरम्यान, व्हॉट्सअ‍ॅप नेहमीच आपल्या वापरकर्त्यांसाठी विविध फिचर आणत असते. त्यांना चांगला प्रतिसादही मिळतो.

# अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक पृथ्वीराज कपूर



**निमित्त**

हिंदी चित्रपटसृष्टीतील 'मुघल-ए-आझम' म्हटल्या जाणाऱ्या अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचा आज स्मृतिदिन आहे. जगातल्या हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक नवा आयाम दिला आहे. त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने त्याने सर्वांची मने जिंकली आहेत. पृथ्वीराज कपूर यांनी मूकपटांपासून आपल्या करिअरची सुरुवात केली आणि रंगीत चित्रपटांपर्यंतचा प्रवास केला. पृथ्वीराज कपूर यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९०६ रोजी पाकिस्तानातील समुद्री येथे झाला. लोक त्यांना 'बॉलीवूडचे ग्रँड फादर' म्हणतात. त्यांच्या वाढदिवसाच्या खास निमित्त त्यांच्याशी संबंधित रंजक किस्से जाणून घेऊया...

पृथ्वीराज कपूर यांनी लाहोरच्या एडवर्ड कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले. यानंतर त्यांनी नाटक आणि नाट्यक्षेत्रात काम करण्याचा विचार केला. पण जास्त शिकलेले असल्यामुळे त्यांना नाटकात काम मिळालं नाही. यानंतर ते १९२९मध्ये मुंबईत आले आणि इम्पीरियल फिल्म कंपनीत विनापगार अतिरिक्त कलाकार म्हणून काम करू लागले.

पृथ्वीराज कपूर यांनी वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी 'आलमआरा' या पहिल्या बोलक्या चित्रपटात तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंतची भूमिका साकारली होती. १९४१मध्ये आलेल्या 'सिकंदर'मध्ये त्यांनी सिकंदरची भूमिका केली होती. १९६०मध्ये 'मुघल-ए-आझम'ची भूमिका साकारून ते एक 'माईल स्टोन' बनले. 'आलमआरा'पूर्वी पृथ्वीराज कपूर यांनी नऊ मूकपटांमध्ये काम केले होते. १९२९मध्ये प्रदर्शित झालेला 'सिनेमा गर्ल' हा मुख्य अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. या चित्रपटासाठी त्यांना ७० रुपये मानधन मिळाले होते.

१९६०मध्ये त्यांनी 'मुघल-ए-आझम' या चित्रपटामध्ये अकबराची भूमिका साकारली होती. हे पात्र त्यांच्या करिअरसाठी मैलाचा दगड ठरले. त्यांचा जबरदस्त अभिनय आजही लोकांच्या स्मरणात आहे. या चित्रपटात दिलीप कुमार, मधुबाला, दुर्गा खोटे आणि निगार सुलतान यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाने अनेक विक्रम मोडले. चित्रपटाची रंगीत आवृत्ती २००४ साली प्रदर्शित झाली होती.

पृथ्वीराज कपूर यांनी १९४४मध्ये पृथ्वी थिएटर्सची स्थापना केली. हे थिएटर देशभर गाजले होते. १६ वर्षांच्या प्रवासात त्यांनी जवळपास २६६२ नाटके सादर केली होती. आजकाल या थिएटरची देखभाल शशी कपूर यांची मुलगी संजना करत आहे. बॉलिवूडमधील कपूर कुटुंबाची गणना प्रसिद्ध कुटुंबांमध्ये केली जाते. शशी कपूर, शम्मी कपूर, ऋषी कपूर, राज कपूर, रणबीर, करीना, करिश्मा कपूर असे अनेक स्टार्स या घराण्यातून बॉलीवूडला मिळाले आहेत.

पृथ्वीराज कपूर यांचा शेवटचा चित्रपट 'आवारा', 'कल आज और कल' ज्यामध्ये कपूर कुटुंबातील तीन पिढ्यांनी काम केले. २९ मे १९७१ रोजी पृथ्वीराज कपूर यांनी या जगाचा कायमचा निरोप घेतला.

पृथ्वीराज कपूर यांना १९६९ साली कला क्षेत्रात पद्मभूषण देऊन भारत सरकारने सन्मानित केले होते. १९७२मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला. १९५४मध्ये पृथ्वीराज कपूर यांना संगीत नाटक अकादमी फेलोशिप देण्यात आली. १९६९मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. भारतीय सिनेमामध्ये त्यांची सर्वाधिक प्रशंसा होत असे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




**कोलकाता : पश्चिम बंगाल आणि बांगलादेश किनारपट्टी भागात रेमल चक्रीवादळ धडकले. तत्पूर्वी बंगालच्या उपसागरावर काळे ढग पसरले होते, ज्याचे छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल झाले.**

## आरोग्य प्रहर

# गरम पाण्यात मध तसेच रात्री दही खाणे घातक

आपण जेवताना किंवा नकळत अशा काही गोष्टी खातो ज्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. वजन कमी करण्यासाठी काही लोक सकाळी कोमट पाण्यात मध घालून पितात. तर काही जण रात्रीच्या वेळेस दही खातात. यामुळे आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, असे आपल्याला वाटते, पण खरंच चुकीच्या फूड कॉम्बिनेशनमुळे तब्येत बिघडू शकते का?



कोणते पदार्थ एकत्र खाणे योग्य नाही? आयुर्वेदनुसार कोणते पदार्थ एकत्र खाऊ नये, याची माहिती आयुर्वेद डॉक्टर दीक्षा भावसार यांनी दिली आहे. त्यांनी आयुर्वेदानुसार कोणत्या गोष्टी एकत्र खाऊ नये याची माहिती शेअर केली आहे.

आयुर्वेदानुसार कोमट पाण्यात मध घालून पिणे हे विरुद्ध अन्न मानले जाते. शिवाय मध गरम करून खाऊ नये. मधामध्ये गोड, तुरट गुण असतात, जे शरीरातील कफ संतुलित ठेवतात. कोमट मध हे विष आहे, ज्यामुळे शरीरात एएमए किंवा विषारी घटक तयार होतात. याचे गुणधर्म शरीरात गेल्यावर विषामध्ये बदलते.

रात्रीच्या वेळेस शिवाय नुसते दही खाऊ नये. यासंदर्भात, दीक्षा भावसर सांगतात, लठ्ठपणा, कफाचे विकार, रक्तस्त्रावाचे विकार आणि दाहक स्थिती असलेल्या लोकांनी रात्रीच्या वेळेस दही खाणे टाळणे उत्तम. त्यामुळे दिवसा दही खावे.

जेवणाच्या अर्धा ते एक तास आधी फळे खाल्ल्यास शरीराला भरपूर पोषण मिळते, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे, मात्र जेवणानंतर फळे खाल्ल्यास अन्नासोबत फळांच्या अतिरिक्त कॅलरीज शरीरातून निघून जातात, ज्यामुळे आरोग्याला अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. अन्नासोबत फळे न खाणे आणि जेवल्यानंतरही लगेचं फळांचे सेवन न करणे हे उत्तम ठरते.

आयुर्वेदानुसार गरम पाण्याने केस धुतल्याने केस गळणे, केस पांढरे होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे कोमट पाण्याने केस धुवू नये.

सायंकाळपेक्षा सकाळी व्यायाम करणे उत्तम. आपण सकाळी वेळ नसेल तर, आपण सायंकाळी हलका व्यायाम करू शकता, परंतु सायंकाळी जोमाने व्यायाम केल्याने कॉर्टिसॉल नावाचा हार्मोन रिलीज करू शकतो. ज्यामुळे झोपेमध्ये व्यत्यय येऊ शकते.

# आरोग्य विभागाकडून क्रीडा संकुलाचे भाडे थकले

## दोन वेळा पत्रव्यवहार करूनही दुर्लक्ष



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कोरोना काळात जिल्हा परिषदेने उपचार केंद्र म्हणून अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या इमारतींचा वापर केला होता. कोरोना नियंत्रणात आल्यानंतर या इमारतीचा कोरोना उपचार केंद्र म्हणून बंद झाला, मात्र या इमारतीचा वापर व वीज बिलापोटी असलेले ३३ लाख ५३ हजार ४९४ रुपये भाडे अद्यापही जिल्हा क्रीडा विभागाला मिळालेले नाही.

कोरोना काळ संपल्यानंतर आरोग्य विभागाने क्रीडा संकुलमधील केंद्र बंद केले, मात्र कोरोना केंद्रासाठी केलेल्या तोडफोडीमुळे खोल्यांची दुरूस्त करणे आवश्यक होते. त्यामुळे क्रीडा संकुलातील इनडोअर खेळ बंद झाले. गेली तीन वर्षांपासून क्रीडा संकुलाचा हा भाग बंद आहे. नोव्हेंबर २०२३मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक झाली होती. जिल्हधिकाऱ्यांनी संकुलाच्या परिस्थितीबाबत आढावा घेतला. सुंकलाच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना आरोग्य विभागाला दिल्या होत्या.

जिल्हा क्रीडा विभागाने आरोग्य विभागाला २९ सप्टेंबर २०२२ रोजी प्रथम पत्र लिहून कोरोना सेंटर म्हणून संकुलातील वापरलेल्या सुविधा आणि वीज बिलापोटी असे ३३ लाख ५३ हजार ४९४ रुपये भाडे मिळावे अशी मागणी केली होती. त्यानंतर १९ नोव्हेंबर २०२३ रोजी स्मरण पत्र लिहून भाडे मिळण्यासाठी मागणी केली. जिल्हा परिषदेने निधी उपलब्ध झाल्यावर भाड्यापोटीची रक्कम अदा केली जाईल, असे पत्राने कळविले आहे, मात्र अद्यापही जिल्हा क्रीडा संकुलाला ही भाडे रक्कम मिळालेली नाही. क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरूस्तीसाठी सध्या शासन स्तरावरून निधी उपलब्ध होत नाही, त्यामुळे क्रीडा संकुलाला स्वतःच प्रयत्न करून निधी उपलब्ध करावा लागत आहे.

संकुलाची देखभाल दुरूस्ती, लाईट बील, कर्मचाऱ्यांचे पगार हा खर्च भागविताना क्रीडासंकुल प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागते.

यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांच्याशी संपर्क साधला असता त्या बैठकीत व्यस्त असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.


**कोरोना सेंटर म्हणून आरोग्य विभागाने वापरलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या इमारतीच्या भाड्यापोटी ३३ लाख ५३ हजार ४९४ रुपये येणे आहेत. याबाबत दोन वेळा आरोग्य विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे, मात्र अद्याप भाडे मिळालेले नाही. जिल्हा क्रीडा संकुलाचे भाडे मिळण्यासाठी आता जिल्हा प्रशासनाकडेही पत्रव्यवहार करणार आहोत.**

**–राजेंद्र अतनूर, जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड**

# कागदोपत्री बंद वरंध घाटात वाहतूक मात्र सुरूच

**महाड : प्रतिनिधी**

म्हाप्रळ –पंढरपूर मार्गावरील वरंधा घाट कागदोपत्री बंद असला तरी प्रत्यक्षात मात्र वाहतूक आजही सुरू आहे. यामुळे पावसाळ्यात वरंध घाट धोकादायक बनला आहे.



म्हाप्रळ –पंढरपूर मार्ग हा पुणे जिल्ह्याला जोडणारा जवळचा मार्ग असल्याने गेली अनेक वर्षांपासून या मार्गावरून वाहतूक सुरू आहे. हा घाट अरुंद असल्याने रुंदीकरणाचे काम दोन वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. सन २०२१च्या अतिवृष्टीमध्ये माझेरी, पारमाचीदरम्यान घाट जागोजागी खचला होता. त्यामुळे रस्ता बंद होता. त्यानंतर कोट्यवधींच्या भिंती उभारून हा मार्ग सुरू करण्यात आला. सद्यस्थितीत वाघजाईपासून ढालकाठीपर्यंत जागोजागी मातीचा भराव, संरक्षक भिंती उभी करण्यासाठी केलेले खोदकाम आणि छोट्या–मोठ्या आलेल्या दरडी आजही तशाच असल्याने घाटामध्ये धोकादायक स्थिती निर्माण झालेली आहे.

जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी एक महिन्यापूर्वी रस्त्याच्या कामाकरीता हा घाट बंद करण्याचा आदेश दिला होता, मात्र प्रत्यक्षात घाट आजही सुरूच आहे. रस्त्यात टाकलेल्या दगडी मातीचा भराव बाजूला करून वाहनचालक घाटातून प्रवास करीत आहेत.

घाटात केलेल्या खोदकामामुळे पावसाळ्यात दगड किंवा माती रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. घाट बंद करण्याचे हेतूने रस्त्यामध्ये मोठे दगड ठेवण्यात आले आहेत, मात्र तरीदेखील घाटातून वाहतूक सुरूच आहे. याबाबत कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# मुरूड शहरातील विविध विकासकामांची आमदार महेंद्र दळवींकडून पाहणी

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या माध्यमातून मुरूड शहराच्या सर्वांगीण विकास आज होत आहे. साळाव ते मुरूड रस्ता पूर्ण झाला आहे. नांदगाव ते मुरूड रस्त्याच्या कामात त्रुटी असून त्याची चौकशी करण्यात येणार असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.



आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड समुद्रकिनारा सुशोभीकरण कामाची पाहणी केली. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी सभापती किशोर धामणस्कर, शहरप्रमुख संदीप पाटील, तालुका संघटक दिनेश मिणमिणे, महेश पाटील, तालुका शिवसेना प्रमुख ऋशिकांत डोंगरीकर, सागर चौलकर, माजी नगरसेवक गिरीश साळी आदी उपस्थित होते. या वेळी त्यांनी या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद गेस्टहाऊसच्या मागील भागातील सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर असून येथे पर्यटकांसाठी स्विमिंग पूल, चेंगिंग रूम, सर्व सोईसुविधा असणारा बगीचा, लहान मुलांसाठी खेळणी लावण्यात येणार आहेत. शहरातील नागरिकांशी चर्चा करण्यासाठी २ जून रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील वाहनतळाचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. नांदगाव समुद्रकिनाऱ्यावरही संरक्षक भिंत बांधण्यासाठी लवकरच कार्यवाही करणार आहे. मी माझ्या कामातून असंख्य कार्यकर्ते आज माझ्यासोबत आहेत. तेच पुन्हा एकदा मला विजयी करणार आहेत.

गारंबी व फणसाड धरणसाठी सुमारे ४३ कोटी रुपयांचा निधी आणला आसून लवकरच ही कामे मार्गी लागणार आहेत. मुरूड आगराचा प्रश्न सोडवण्यासाठी २ जून रोजी विभाग नियंत्रकांसोबत बैठक होऊन सर्व प्रश्न सुटणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मातृवृक्षावरील आंबा फळांचा जाहीर लिलाव

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कृषी चिकित्सालय फळरोपवाटिका वेश्वी, अलिबाग या शासकीय फळरोपवाटीकेतील नियमित बाब व नाशवंत आंबा फळे असल्यामुळे मातृवृक्षावरील आंबा फळांचा जाहीर लिलाव बोली पद्धतीने ५ जून रोजी सकाळी ११ वा. घेण्यात येणार आहे.

इच्छुक संस्था, व्यक्तींनी लिलावाच्या दिवशी शासकीय फळरोपवाटिकेवर हजर रहावे, तसेच फळबाग व लिलावासंबंधी अटी व शर्ती कृषी चिकित्सालय फळरोपवाटिका वेश्वी या शासकीय फळरोपवाटिकेच्या कार्यालयात शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सोमवारी (दि.२७) पहावयास उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे बेलवली, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार १) श्री. रामा लडकू पवार, २) श्री. रमेश लडकू पवार, ३) श्री. अर्जुन लडकू पवार आणि ४) शोभा एकनाथ शेळके यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे बेलवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक | क्षेत्र पोटखराबा | क्षेत्र एकुण क्षेत्र | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| | | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | |
| २६५/२ | १ | ०–२२–१० | ०–०१–४० | ०–२३–५० | ५.२३ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २८/०५/२०२४
**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही / –**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए, एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website** https://srmetender.mahatransco.in **for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031187** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-23/ 2024-2025.** RFx e-tender for Supply of Silica Gel, Cotton Cloth, Petroleum Jelly and Polythene Paper at various substation under EHV O&M Division Panvel**...2nd call.** **Tender amount Rs. 4,97,456/-,** **EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **28.05.2024, 17:00 Hrs. to 04.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 04.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **05.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना सावधानतेची सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कोषागारामार्फत निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात. हे लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत संपर्क साधला जात नाही किंवा ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. कोषागार कार्यालयामार्फत फक्त लेखी स्वरुपात पत्रव्यवहार केला जातो, अशी माहिती जिल्हा कोषागार अधिकरी देवीदास टोंगे यांनी दिली आहे.

याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना फोन करून ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारातील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जाते आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा फोन जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत केला जात नाही किवा कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.

सर्व निवृत्तीवेतनधारक व कार्यरत कर्मचाऱ्यांना दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरुन उपरोक्त प्रदानासंदर्भात संपर्क साधून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरण्याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविले जात नाही. तरी कोणीही अशा दूरध्वनी संदेशास प्रतिसाद देऊ नये. याबाबत निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकाची वैयक्तिक जबाबदारी रहील, याची नोंद घ्यावी. तसेच अशा प्रकारच्या दूरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया कोषागार कार्यालयास अवगत करावे, तसेच कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमतः कोषागार कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) देवेंद्र पाटील यांनी केले आहे.

# रंग वैशाखाचे साहित्यिक मैफिल उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

कोमसाप मुरूडतर्फे दत्त मंदिर टेकडीवर रंग वैशाखाचे साहित्यिक मैफिल उत्साहात झाली.

प्रथम शाखाध्यक्ष संजय गुंजाळ, उपाध्यक्षा उषा खोत, कार्याध्यक्ष अरूण बागडे, सचिव नैनिता कर्णिक, प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, प्रमुख अतिथी देवदत्त साने, डॉ. रवींद्र नामजोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर गझलकार सिद्धेश लखमदे, लेखक व कवी देवदत्त साने, दिपाली दिवेकर, रुद्धी भगत, वासंती उमरोटकर, उषा खोत, नैनिता कर्णिक, प्राची केने, योगेश दवटे, आशिष पाटील, आशुतोष कर्णिक, शकुंतला रोटकर, संजय गुंजाळ यांनी मैफिलीला सुरुवात केली.

डॉ.नामजोशी यांच्या गीतांना अरूण बागडे यांनी तबला व देवदत्त साने यांनी हार्मोनियमची साथ दिली. कोमल देशमुख या युवतीने चालू मैफिलीचे छान स्केच करून शाखेला भेट दिली. सूत्रसंचालन उर्मिला नामजोशी यांनी, तर सचिव नैनिता कर्णिक यांनी आभार मानले.



# शासकीय फळरोपवाटिकेत मजुरांबाबत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कृषी अधिकारी, कृषी चिकित्सालय फळरोपवाटिका वेश्वी, अलिबाग या शासकीय फळरोपवाटिकेमध्ये विविध प्रकारची कामे करण्यासाठी (रोजंदारीवर) मजूरपुरवठा करण्याबाबत निविदा पद्धतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

इच्छुक संस्था, व्यक्तींनी कृषी अधिकारी, कृषी चिकित्सालय फळरोपवाटिका वेश्वी, अलिबाग या कार्यालयाच्या नावे दरपत्रक शासकीय सुट्टीचे दिवस वगळून ५ जून रोजी सकाळी ११ वा. पर्यंत निविदा सादर कराव्यात असे आवाहन कृषी अधिकारी, कृषी चिकित्सालय फळरोपवाटिका वेश्वी, अलिबाग यांनी केले आहे, तसेच निविदा दरपत्रके त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता उघडल्या जातील.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे–वारदोली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ४६/१ | ०–६४–४० पो.ख. ०–०७–१० **एकूण – ०–७१–५०** | ९.८१ | **अजय बाळाराम भगत संजय बाळाराम भगत विद्या गणपत भगत गीतांजली गणपत भगत** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २८/०५/२०२४.**
**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१

## PLUBLIC NOTICE

This is to inform the public at large that, Smt. Rupali Sambhaji Shinde & Mr.Sambhaji Balaso Shinde are the owner of all that premises of Flat No- 304 adm 221 Sq. Ft. (Carpet), on 03 rd th Floor, in the Building Known as "Shiv Sai,House No. 441" in the Society Known as "Shiv Sai Co. operative Housing Society Ltd". Constructed on Property bearing House no. 441,Village Asudgaon, Tal. Panvel and Dist. Raigad.

That , Smt. Rupali Sambhaji Shinde & Mr.Sambhaji Balaso Shinde has purchased the said flat from Mr.Mahendra Faragade & Smt Nita Mahendra Faragade as seller and Shiv Sai Co-Operative Housing Society ltd. As Confirming Party, on 24th October 2019, Registered in the office of Sub-Registar of Assurance Panvel-1 at Serial no. 9344/2019.

That Smt. Rupali Sambhaji Shinde & Mr.Sambhaji Balaso Shinde has purchased the said flat from M/s Gokuldham construction by and under Agreement for Sale dated Serial no. 9344/2019, that the original Agreement for sale dated 24th October 2019and registration receipt have been misplaced or lost and Smt. Rupali Sambhaji Shinde has lodged FIR for the same bearing no. 0611/2024 with Khandeshawr Police Police Station, Khanda Colony, New Panvel .

If any person having any claim, right, title and interest therein or any part thereof in the nature of sale, heir, lease, Gift, Mortgage, Assignment, Trust, Charge, Legacy, Possession, Lien etc or in any other manner or authority is hereby called upon to intimate and make known to the undersigned within 07 days from the publication of this notice of his/her/ their claim, if any, with all supporting documents, failing which the same shall be treated as waived and not binding on my clients and accordingly the said flat will be funded.

Date : 28-05-2024
Place : Navi Mumbai.

Sd/-
**ADV.MINAL BHARAT THORAVE**
B.COM, G.D.C.& A, L.L.B.
OffICE: 201, B WING, Buldg.no-3, Triveni Sangam CHS. Ltd. Sector-8, Khanda Colony, New Panvel -410 206.Contact No. 7588683915.

## निवडक

### प्रवासादरम्यान सोनसाखळी चोरली

**पनवेल :** एसटी बसमध्ये चढत असताना कुणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन प्रवाशाच्या गळ्यातील सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरल्याची घटना पनवेल एसटी आगारामध्ये घडली आहे. विशाल पाटील (वय ३६) हे पेणमध्ये जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना कुणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवून त्यांच्या गळ्यातील जवळपास ७० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरातून दोन दुचाकींची चोरी

**पनवेल :** परिसरातून दोन दुचाकी चोरीस गेल्याची घटना घडली आहे. आदई येथे राहणारे रणजित रतन सिंग यांनी त्यांची मोटरसायकल पॅनेसिया हॉस्पिटलजवळ असलेल्या मेडीकल शॉपच्या बाहेर उभी ठेवली होती. अज्ञात चोरट्यांनी ही मोटरसायकल चोरून नेली आहे. या गुन्ह्याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत करण दोरे यांनी त्यांची दुचाकी खारघर रेल्वे स्टेशनच्या बाहेर यशस्वी फाईन डाईन हॉटेल समोर उभी करून ठेवली असता अज्ञातांनी दुचाकी चोरून नेली. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नेहा रवींद्र पुजारी (वय १९) असे या तरुणीचे नाव असून चेहरा गोल, रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची चार फुट नऊ इंच, डोक्याचे केस काळे वाढलेले, डोळे काळे मोठे असून गळ्यामध्ये सोन्याची साखळी, कानामध्ये सोन्याची बुट्टी, कपाळावर कुंकू लावलेले तसेच अंगात पिवळा टॉप व हिरवी लेगिझ, पायात काळी चप्पल सोबत मोबाईल फोन असून, तिला कन्नड, हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप पेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नवीन पनवेलमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** घराबाहेर फेरफटका मारण्याकरता गेलेले ६१ वर्षीय आदेश गजानन शेट्टे (रा. सेक्टर ४, नवीन पनवेल) हे घरी परत न आल्याने ते हरवले असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्यांची उंची ५.५ फूट, रंग गोरा, नाक सरळ, चेहरा उभट आहे. त्यांचे केस पांढरे असून बांधा सडपातळ आहे. त्यांनी अंगात निळा हाफ शर्ट, राखाडी ट्रॅक पॅन्ट, पायात सफेद चप्पल घातली आहे. त्यांना जन्मापासून पोलिओ असल्याने ते उजव्या पायाने अपंग आहेत. तसे त्यांना मानसिक आजार असून ते वेडसर आहेत. नाकावर डाव्या बाजूला चामखीळ आहे. त्यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार पी.के. पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पालिका शाळांचा ९७.४५% निकाल

**नवी मुंबई :** महापालिका क्षेत्रातून एकूण १५७ शाळांमधून १५ हजार ६६२ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेसाठी अर्ज केला होता. त्यापैकी १५ हजार ६३६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातून १५ हजार २३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. नवी मुंबईचा एकूण निकाल ९७.४५ टक्के लागला आहे. नवी मुंबईच्या निकालात उत्तीर्ण होणाऱ्यांच्या संख्येत यंदाही मुलींनी बाजी मारली आहे.

### आपटा स्कूलचे एसएससीत यश

**रसायनी :** 'कोएसो'च्या शंकर शिवराम पाटील माध्यमिक विद्यालय आपटा शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे. विद्यालयातून प्रथम सावंत अनमोल विनायक ७४.६० टक्के, द्वितीय चव्हाण हर्षदा अनंत ७२.४० टक्के, तृतीय मेहेतर सार्थक मोहन ७१.४० टक्के, चौथा भालेकर स्वराज समीर ७१.२० टक्के, पाचवा क्रमांक रागिणी श्रवण ७०.४० यांनी पटकाविला आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक व सर्व सहकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# फ्लेमिंगो अधिवासात मद्यपींचा वावर

## बीट मार्शलची गस्त वाढविण्याचा निर्णय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

फ्लेमिंगो पक्ष्यांचा प्रमुख अधिवास असलेल्या नवी मुंबईतील डीपीएस तलावाला पुन्हा पाणथळीचे रूप येत आहे. असे आशादायी चित्र असताना या तलावानजीक असलेल्या टी एस चाणक्य तलावापासून काही अंतरावर गेले काही दिवस तरुणांच्या मद्य मेजवान्या झडत असल्याची धक्कादायक बाब उजेडात आली आहे. काही तरुण दुचाकीवरून या भागात येत असून येथील बामणदेव मंदिरामागील जागेत बसून मद्यसेवन करीत असल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत. याची गंभीर दखल घेत पोलिसांनी बीट मार्शल गस्त वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.



पामबीच मार्गावरील टी एस चाणक्य सिग्नलवरून फ्लेमिंगो तलावाकडे येणाऱ्यांची संख्या खूप मोठी असून दुसरीकडे पामबीच मार्गावरून बामणदेव परिसरात व टी एस चाणक्य परिसरात दुचाकी घेऊन जाणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. मूळातच या भागात वाहने नेण्यास परवानगी नाही, परंतू दुचाकीवरून मुलामुलींचे जत्थे या परिसरात जातात तसेच रात्रीच्या अंधारात या परिसरात मद्याच्या पार्ट्या झडत असल्याचे पाहायला मिळते.

शहरात फ्लेमिंगोंचे अधिवास क्षेत्र असून याकडे सिडको लक्ष देण्याची मागणी होत आहे. तर महापालिकेनेही आपल्या विकास आराखड्यात फ्लेमिंगो अधिवासाबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे, परंतू शहरातील फ्लेमिंगो अधिवास असलेल्या टी. एस. चाणक्य तलाव व नेरूळ एनआरआय तलाव येथे लाखो फ्लेमिंगोंचे आगमन होत आहे. डीपीएस तलाव येथील खाडीतून तलावात पाणी येण्याचा मार्गच बंद झाल्याने या ठिकाणी यंदाच्या हंगामात फ्लेमिंगोचे दर्शन झाले नव्हते, परंतु नुकतेच या ठिकाणी खाडीचे पाणी येण्याचा मार्ग खुला केल्याने नेरूळ डीपीएस तलावातही फ्लेमिंगो पाहायला मिळाले. फ्लेमिंगोंना भरपूर खाद्य मिळत असल्याने नवी मुंबईतील पाणथळ जागेत त्यांचा वावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो.

टी. एस. चाणक्य परिसरात चारचाकी वाहनांची सातत्याने वर्दळ पाहायला मिळत असून छुप्या पध्दतीने अंधाराचा फायदा घेत फ्लेमिंगो अधिवासात होणाऱ्या पार्ट्यांवर पोलिसांनी नजर ठेवण्याची आवश्यकता आहे. या परिसरात साफसफाई करताना मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या प्लास्टिकच्या बाटल्या सापडतात. पाण्यातही दारूच्या बाटल्या सापडत असून पालिकेने या परिसरात निर्माल्य कलश ठेवला आहे, परंतु दारू पिणे व बाटल्या फेकून येथील सौंदर्याला व सुरक्षिततेला बाधा पोहचवण्याचे काम करू नये, सेव्ह मॅंग्रोजचे धर्मेश बराई सांगितले.

**फ्लेमिंगोंच्या परिसरात दुचाकी घेऊन जाण्यास निर्बंध असताना दुचाकीवरून मोठ्या प्रमाणात तरुणाई बामणदेव मंदिराच्या पाठीमागे जाते. त्यामुळे अनुचित प्रकार होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी व पालिकेने पामबीच मार्गावरून बामणदेव भागात जाणारा बेकायदा मार्ग बंद केला पाहिजे. बॅरिकेड्स तोडण्यात आले आहेत.**
**–सुनील अग्रवाल, पर्यावरणप्रेमी**

**युवकांचे दारू पिणे, मंदिर परिसरात उशीरापर्यंत जाणे व दारू पिणे असे प्रकार चालत असतील तर याबाबत पाहणी करण्यात येईल. बीट मार्शल यांची गस्त वाढवण्यात येईल.**
**–गिरीधर गोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सीबीडी बेलापूर**

# जाहिरातीला भुलून महिलेने गमावले कोट्यवधी

## सट्टा बाजारात परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

केवळ समाजमाध्यमातील जाहिरातीला भुलून एका महिलेने सट्टा बाजारात तब्बल एक कोटी सात लाख नऊ हजार रुपयांची टप्प्याटप्प्याने गुंतवणूक केली, मात्र परतावा मिळालाच नाही शिवाय ज्यांच्या सल्ल्याने पैसे गुंतवले त्यांची पैशांची मागणी संपत नसल्याने शेवटी याबाबत सायबर पोलीस ठाण्यात अज्ञान व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर येथे राहणाऱ्या एका महिलेस सट्टा बाजारात पैसे गुंतवा भरघोस परतावा मिळावा अशा आशयाची जाहिरात समाजमाध्यमात पाहण्यात आली. सुरुवातीला दुर्लक्ष केले, मात्र कुतुहूल म्हणून त्यांनी त्या जाहिरातीवर क्लिक केले. त्यांचा समावेश तत्काळ एका व्हॉट्सअॅप समूहात करण्यात आला. त्या ठिकाणी सट्टा बाजारातील उलाढाली त्याची चर्चा, प्रश्नोत्तरे असे चालत होते. त्यात अनेकजण त्यांना भरपूर परतावा मिळाला असे सांगत असल्याने आपणही पैसे गुंतवावे या विचाराने त्यांनी त्या व्हॉट्सअॅप समूह प्रशासकाला विचारणा केली. त्यांनी तत्काळ त्यांना एक अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले.

या अॅपमध्ये तुम्ही किती पैसे गुंतवले आणि त्याचा परतावा किती मिळाला हे पाहू शकत होते. फिर्यादी महिलेने सुरुवातीला काही पैसे गुंतवले, त्यांना चार दिवसांत दीडपट परतावा मिळाला. त्यामुळे त्यांनी थोडे थोडे करत पन्नास लाखांपेक्षा अधिक रुपये गुंतवले, मात्र परतावा मिळत नसल्याने त्यांनी याबाबत समूह प्रशासकास विचारणा सुरू केली. त्यांनी विविध कर, सांगत अजून पैशांची मागणी सुरू केली. त्यांनी भरलेल्या पैशांपेक्षा तिप्पट परतावा त्या अॅपमध्ये दिसत असल्याने त्या पैसे भरत गेल्या मात्र दिसणारा परतावा त्यांच्या बँक खात्यात मात्र जमा होत नव्हता.

अशा पद्धतीने १३ फेब्रुवारी ते १५ मेच्या दरम्यान तब्बल एक कोटी सात लाख नऊ हजार रुपयांची टप्प्या टप्प्याने गुंतवणूक केली, मात्र परतावा मिळाला नाहीच, त्यामुळे त्यांनी नेरूळ सायबर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. या अर्जाची दखल घेत अज्ञात सहा जणांच्या विरोधात संगनमत करून फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे

# पनवेल परिसरातील बार, वॉईन शॉप, पबवर 'वॉच'

**पनवेल : वार्ताहर**

पुण्यात घडलेल्या ड्रंक अॅण्ड ड्राईव्हच्या घटनेची पुनरावृत्ती पनवेल परिसरात होवू नये यासाठी परिमंडळ दोन हद्दीतील सर्वच पोलीस ठाण्यामध्ये असलेले बार, वॉईन शॉप व पबवर पोलिसांसह दारुबंदी विभागाचे कडक लक्ष आहे.

पुण्यातील घटनेमुळे पोलिसांसह दारुबंदी विभाग, आरटीओ आता सतर्क झाले असून बार, वॉईन शॉप व पब मध्ये अल्पवयीन मुलांवर नजर ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रात्रभर सुरू असणाऱ्या डान्स बारवर सुद्धा पोलिसांचे लक्ष आहे तसेच बाजारात येणाऱ्या नवनवीन महागड्या गाड्या यांनी अधिकृत शासकीय परवाने घेतले आहेत का? याकडे आरटीओ विभागाचे लक्ष आहे. त्या दृष्टीने आता रात्रीच्या वेळी वाहन तपासणी, नाका बंदी, ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह सारख्या केसेस करण्याकडे पोलिसांचे आता विशेष लक्ष आहे.

# आदिवासी बांधवांना कपडे, खाऊचे वाटप

**उरण : वार्ताहर**

पुनाडे अदिवासी वाडीवर रविवारी (दि. २६) कपडे, खाऊ वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात आला. आदिवासी बांधवांना कपडे आणि खाऊ मिळाल्यानंतर बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आयोजकांचे मन सुखावले.

हा उपक्रम इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली पूर्व, येथील मुख्याध्यापिका निर्जला पाटील, शिक्षिका अस्मिता सामंत, विजया नायर, लिपिक रेखा राजे, वर्षा प्रभू, शितल बापट, चैताली घमंडे, अजित मोरे, प्रकाश सावंत. केळवणे – पनवेल येथील शिक्षक प्रसिद्ध चित्रकार गिरीश मारुती घरत, चेंबूर मुंबई येथील बाल विकास संघाचे शिक्षक व कर्मचारीवर्ग ज्योती घरत, पाणदिवे गावची शिक्षिका कृतिका ठाकूर, तसेच सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठानचे अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच सारडे विकास मंचचे सदस्य धनंजय म्हात्रे आणि आदर्श शिक्षक रवींद्र पाटील आदींनी राबविला.

सदाबहार दोस्ती गृप प्रतिष्ठानचे सदस्य संतोष जोशी, कामेशवर म्हात्रे, सचिन पाटील, कैलास पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, विजय गावंड, अरुण म्हात्रे, मोक्ष गिरिष घरत, अनुष सचिन पाटील. आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. सूत्रसंचालन कामेशवर म्हात्रे तर स्वागत हरीश म्हात्रे यांनी हे केले. सर्व दानशूर व्यक्तींचे तसेच उपस्थितांचे संतोष जोशी यांनी आभार मानले.



# बारावी उत्तीर्ण नेहा कातकरीचा गौरव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चावणे येथील बारावीचा वाणिज्य शाखेत शिक्षण घेणारी नेहा कातकरी हिने मेहनतीचे चीज केले असून तिच्यावर रसायनी पाताळगंगा परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पाताळगंगा येथील कोकुयो कॅमलीन कंपनीतर्फे तिचा गौरव करण्यात आला.

नेहा बाळाराम कातकरी ही रोज येता जाता आठ किमी पायी प्रवास करुन चावणे येथील शाळेत शिक्षण घेत आहे. तिने बारावी वाणिज्य शाखेत परिसरात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. दुर्गम भागातील गरीबीची झळ सोसत नेहाने कष्टाचे चीज केले आहे.



नेहा बाळाराम कातकरी हिच्या यशाबद्दल तिचे पाताळगंगा येथील कोकुयो कॅमलीन कंपनीचे वरिष्ठ जनरल मॅनेजर दीपक कापसे यांच्याहस्ते शालेय उपयोगी किट संच देऊन गौरविण्यात आले. या वेळी अकौट विभागाचे सचिन सावंत, धनेश पाटील, रूपेश ठाकूर, उत्पादन विभागाचे शंतनू भालगे, निखिल कुलकर्णी, धनंजय ठाकूर, प्रतीक साहू, परचेस विभाग दर्शन माळी, अमर भोसले, स्टोअर विभागाचे गणेश ओव्हाळ, एचआर विभागाचे प्रसाद खैरे, महेश पाटील, सुरक्षा विभागाचे प्रज्योत डाके आदी उपस्थित होते.

# नूतन मराठी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील नूतन मराठी विद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. सलग २०व्या वर्षी शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. बदक आदित्य रघुनाथ हा ९५.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आला. तर गिरे वेदिका संदीप हिने ९४.२० गुण मिळवून शकेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पाटील ईश्वरी विश्वास. ९१ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला, तर पोतेकर विराज नितीन. ९०.८० टक्के, चौलकर अदिती तुळशीराम. ८६.६० टक्के, गुण प्राप्त केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कांबळे, मार्गदर्शक शिक्षक निलेश सैद, सुजाता मुंढे, लता औटी आणि सुनील पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. एनसीआरडी संस्थेचे वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे, मुख्याध्यापकांचे, शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# 'विद्याभवन'ची १०० टक्के एसएससी निकालाची परंपरा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाने यंदाही १०० टक्के निकालाची वीस वर्षांची परंपरा कायम ठेवली.

विद्याभवन शिक्षण संकुलाच्या मराठी माध्यमातून चैतन्य सुरेंद्र पाटील हा विद्यार्थी ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम आला. कुणाल ज्ञानेश्वर गंधात्ते आणि श्रुतिका लालासाहेब इंदलकर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९४.६० टक्के आणि ९२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय आणि तृतीय आले. मराठी माध्यमाच्या ४५ विद्यार्थ्यांना डिस्टिंशन आणि १५ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी मिळाली.

इंग्रजी माध्यमातून वैभवी विष्णु देसाई हिने ९४.४० टक्के गुण मिळवत प्रथम येण्याचा मान पटकावला. वेदांत महादेव इंगळे आणि गिरीश दत्तात्रय भामबेरे हे विद्यार्थी अनुक्रमे ९३.४० टक्के आणि ९२.६० टक्के गुण मिळवत द्वितीय आणि तृतीय आले.

इंग्रजी माध्यमाच्या ५६ मुलांना डिस्टिंशन, ४२ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी मिळाली. पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह संजय गुंजाळ कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, मुख्याध्यापक गोरख कदम मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे, अस्मिता सलगर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मासिक पाळी दिनानिमित्त वस्त्यांमध्ये मासिका महोत्सव

## शेल्टर संस्थेमार्फत उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

जगभरात २८ मे हा दिवस मासिक पाळी दिन म्हणून साजरा केला जातो. नवी मुंबईमध्ये शेल्टर असोसिएटस संस्था स्वच्छता आणि आरोग्य या विषयावर काम करत आहे. चार हजारांपेक्षा जास्त वैयक्तिक शौचालय संस्थेने नवी मुंबईमधील वस्त्यांमध्ये उपलब्ध करून दिले आहेत तसेच आरोग्य विषयात काम करत असताना मासिक पाळी वरती जनजागृती आणि बाजारातील पॅडला पर्याय म्हणून कापडी पॅड वापर तसेच या पॅडच्या कचऱ्याचे व्यवस्थापन या विषयावर काम वस्त्यांमधील महिलासोबत करत आहे. या कार्यक्रमाची सुरुवात माझी वसुंधराची प्रतिज्ञा स्वच्छता निरीक्षक यांनी नागरिकांना देऊन केली.



जागतिक मासिक पाळी दिन जगभरात साजरा केला जातो याचा एक भाग मासिका महोत्सव हा ११ देशांमध्ये एक आठवडा भर साजरा केला जातो. संस्थेमार्फत नवी मुंबईमधील बेलापूर या ठिकाणी या वर्षीचा मासिका महोत्सव साजरा केला गेला. मासिक पाळी ही नैसर्गिक क्रिया आहे अनेकदा या बाबत बोलले जात नाही. मौन राखले जाते, मासिक पाळी अपवित्र मानली जाते या बाबत बेलापूरमधील रमाबाई नगर, संभाजी नगर, दुर्गा माता नगर, राहुल नगर या वस्त्यांमधील महिलांनी एकत्र येऊन वस्त्यांमधून असणाऱ्या मासिक पाळी या विषयावर असणाऱ्या अंधश्रद्धा, गैरसमज हे कमी झाले पाहिजेत यासाठी विविध खेळ आणि पथनाट्यच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

स्त्री पुरुष समानता सोबतच महिलांना नोकरीच्या ठिकाण बरोबर घरातील कामेसुद्धा करायची असतात आणि त्या बरोबर मासिक पाळीच्या दरम्यानसुद्धा महिलांची मानसिक परिस्थिती समजून घेऊन तिला पोषक, सजग वातावरण मिळवून देण्याची जबाबदारी स्त्री आणि पुरुष दोघांची आहे. या विषयी जनजागृती करण्यात आली, वस्तीमधील १०० मुलांनी मासिक पाळी या विषयावर चित्रकला स्पर्धा मध्ये भाग घेतला होता त्यांची चित्रेसुद्धा दर्शनी भागात लावली होती आणि उत्कृष्ट अशा चित्र काढणाऱ्या मुलांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शेल्टर संस्थे वॉश प्रकल्पाच्या संचालिका धनश्री गुरव, प्रकल्प समन्वयक अमोल गाडे, वैभव काळे आणि संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते मनीषा सुर्वे, सुनीता सकुंडे, अरविंद राठोड, प्रतीक बनसोडे, ज्ञानेश्वर आढे आणि स्वयंसेवक मंजू मंडल, रोशनी राठोड, निशा, शशिकला, नवी मुंबई मनपा कडून स्वछता निरीक्षक महेश मोरे, अजित तांडेल, आरोग्य विभागाच्या परिचारिका जानव्ही साळवी आणि आशा वर्कर, म्युस संस्थेकडून निशांत बंगेरा आणि टीम तसेच बेलापूर पोलीस ठाण्याचे निर्भय पथकाचे सहकारी उपस्थित होते.

# रायगडातील विविध शाळांचे सुयश

### ओंकार विद्यामंदिर, मुरूड

**मुरूड** : मुरूड जंजिरा हिंदू एज्युकेशन सोसायटी संचालित ओंकार विद्यामंदिरचा एसएससीचा निकाल १०० टक्के लागला आहे. या परीक्षेत प्रथम रुद्राणी जोशी ७८.८० टक्के, द्वितीय सार्थक ठाकूर ७७.६० टक्के तर तृतीय क्रमांक आर्या बनिया हिने ७०.४० टक्के मिळविले. हिंदू एज्युकेशन सोसायटी चेअरमन दिलीप जोशी, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### कोएसो हायस्कूल, घोसाळे

**रोहे** : दहावीचा निकाल लागला असून तालुक्यातील कोएसो माध्यमिक विद्यालय घोसाळे हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्रथम समीर उघडा ८१.६० टक्के, द्वितीय संचिता भोसले ८१.४० टक्के, तृतीय आदिती पवार ७८ टक्के मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी, शाळेचे चेअरमन, सदस्य, शिक्षक, पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### अशोकदादा साबळे विद्यालय, माणगाव

**माणगाव** : दहावी परीक्षेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालयाचा निकाल ९५.४२ टक्के इतका लागला. मृणाल सवासे ९६.८० टक्के प्रथम, सई शिंदे ९४.८० टक्के द्वितीय, शरयू कुलकर्णी ९४.६० टक्के संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला. यावर्षी दहावी परीक्षेसाठी १७५ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १६७ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. ६६ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत तर प्रथम श्रेणीत ५८ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी क्रुष्णा गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, शिक्षिका तथा स्वच्छता व आरोग्य समिती सभापती शर्मिला सुर्वे, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, मुख्याध्यापक डी. एम. जाधव उपमुख्यध्यापक दिलीप उभारे, उपप्राचार्य एम. एस. जमधाडे, शाळेचे को-ऑर्डिनेटर शिपूरकर व गणेश वाघरे इंग्लिश स्कूल कमिटी चेअरमन अरुण पवार यांनी अभिनंदन केले.

### जनता विद्यालय, खोपोली

**खोपोली** : खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालयाच्या विभागाचा ९९ टक्के निकाल लागला. प्रथम दर्शील निकम ९६.२ टक्के, द्वितीय आदित्य थिटे ९५ टक्के तर तृतीय क्रमांक गायत्री देशमुख ९३ टक्के मिळविले. जनता विद्यालय लव्हेज विभागाचा ९२.८५ निकाल लागला. कार्मेल कॉन्व्हेंट शाळेचा १०० टक्के निकाल लागला प्रथम क्रमांक वेदांश्री दफळ ९७ टक्के, द्वितीय सृष्टी सक्रे ९६.२० टक्के तर तृतीय आर्या खेंगट ९५ टक्के मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

### एस.एस. हायस्कूल, मोर्बा

**माणगाव** : मोर्बा सोशल सोसायटीच्या एस. एस. हायस्कूल शाळेच्या उर्दू व मराठी माध्यमाचा मिळून एकूण निकाल ९७.७९ टक्के लागला आहे. उर्दू माध्यमातून सिमरन शादूलखान पठाण ९४.२० टक्के प्रथम, उमेमा राऊत ९२.२० टक्के द्वितीय, मेहरोझ गंगरेकर हिने ९० टक्के संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला, तर मराठी माध्यमातून योगिता डोंगरे ८४ टक्के प्रथम, सलोनी इंगळे ८१.८० टक्के द्वितीय, स्नेहल मोरे ८०.८० टक्के संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दीन धनसे, सचिव अस्लम राऊत, सहसचिव कादिर इब्राहिम हर्णेकर, शाळा समिती चेअरमन हुसैन हर्णेकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक खालिद अहमद रशीद खान, पर्यवेक्षिका समसुनिसा गंगरेकर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी असफ पल्लवकर, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

### विद्यामंदिर सारंग

**खालापूर** : विद्या प्रसारिणी सभा संचलित सारंग येथील विद्यामंदिरचा एसएससीचा निकाल ९० टक्के लागला आहे. या परीक्षेत प्रथम भाविका मुसळे ७५.२० टक्के, द्वितीय आर्या दळवी ६६.६० टक्के, तृतीय वेदिका फाटे ६३ टक्के, चतुर्थ सारीका कातकरी ६० टक्के तर पाचवा क्रमांक कार्तिक कातकरी ५५.८० टक्के याने मिळविले. विद्या प्रसारिणी सभा संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

### नचिकेताज् हायस्कूल, मुरूड

**मुरूड** : नचिकेताज् हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला. हायस्कूलमध्ये सुश्मिता दास ९३.६० टक्के प्रथम, दशा सूडकू ८९.२० टक्के द्वितीय, विनायक पवार ८८.६० टक्के प्राप्त करून तृतीय क्रमांक प्राप्त केला. सहा विद्यार्थ्यांनी ८५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले, तसेच सहा विद्यार्थ्यांनी ७० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केले. १० विद्यार्थ्यांनी ६० टक्केपेक्षा जास्त गुण प्राप्त केले. संचालिका मुग्धा दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, संचालिका आराधना दांडेकर, माजी नगरसेवक नितीन पवार, महेंद्र पाटील, विलास पाटील, अनुल किल्लेदार, जितेंद्र पवार, शाळेचे मुख्याध्यापक योगेश तंटक, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## पवित्रा कदम ८५.४० टक्के मिळवून उत्तीर्ण



**चौक** : वावंढळ येथील पवित्रा राकेश कदम हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८५.४० गुण प्राप्त केले. याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. कोयना प्रकल्पग्रस्त गावातील पवित्रा कदम हिने रिलायन्स फाउंडेशन लोधिवली या शाळेतून दहावीची परीक्षा दिली होती. ती ८५.४० टक्के गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे. आपल्या यशात आजोबा हभप बळीराम कदम, आजी हभप कल्पना कदम यांच्याबरोबर आई-वडील, शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे, असे तिने सांगितले.

# आपत्तीशी लढण्यासाठी प्रशासनाची तयारी सुरू

## महाड नगरपालिकेने सज्ज ठेवले बचाव साहित्य

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तीमुळे जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होत आहे. या नैसर्गिक आपत्तीला सामना करण्यासाठी प्रशासन गेली महिनाभरापासून तयारी करीत आहे. महाड नगर पालिकेने नागरिकांना सतर्क ठेवण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि बचाव साहित्याची चाचपणी सुरू केली आहे.





१९८०च्या आधीपासूनच महाडमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्याच्या नोंदी आहेत. १९९२मध्ये पारमाची गावात दरड कोसळून मोठी जीवितहानी झाली होती. त्यापाठोपाठ २००५मध्ये दासगाव, जुई, कोंडीवते, रोहन तर २०२१मध्ये तळीये गावात दरड कोसळून मोठी जीवितहानी झाली. २०१९मध्ये देखील पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. २०१६मध्येही अतिवृष्टीत सावित्री पूल वाहून गेला होता. शहरातील तारिक गार्डन इमारत कोसळून मोठी जीवितहानी झाली होती. कोकणातील पावसाचे प्रमाण मोठे असल्याने भूस्खलन होत आहेत. महाडसह पोलादपूरमध्ये याबाबत भूगर्भ शास्त्र विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार तालुक्यातील अनेक गावे दरडीच्या सावटाखाली आहेत.

डोंगर उतारावर किंवा डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या या गावांना या दरडींचा धोका अधिक आहे. येथील दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना स्थलांतर करण्याच्या सूचना यापूर्वीच केल्या आहेत.

नागरिकांना सुरक्षितरित्या बाहेर काढणे, पूर परिस्थितीत यंत्रणा पुरवणे, नागरिकांना सतर्क करणे, अशा विविध यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. महाड तालुक्यात ४८ गावे दरडग्रस्त तर २४ गावे संवेदनशील यादीत आहेत. महाड उपविभागीय कार्यालयाकडून तात्पुरत्या निवारा शेड आणि याठिकाणी कोणते उपाययोजना केल्या पाहिजेत, याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला सादर केला आहे. या गावातून तात्पुरत्या निवारा शेडकरिता महाड तालुक्यात २४.३९ कोटी तर पोलादपूर तालुक्यात १४.९० कोटी असा एकूण ३९.२९ कोटीच्या निधीची तरतूद अपेक्षित आहे.

महाड नगर पालिकेनेदेखील शहरातील नागरिकांना पूरपरिस्थितीत सुरक्षित बाहेर काढण्यासाठी लागणारी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. यामध्ये दोन पॉली इथिलीन रेस्क्यू दोन बोटी, फुट पंप बोट, मेगा फोन, सर्च लाईट, कटर, रेन कोट, आदी यंत्रणा सज्ज ठेवली आहे. नागरिकांना पूरपरिस्थितीमध्ये स्थलांतरित करण्यासाठी तात्पुरते निवारा शेड आदींची व्यवस्था केली जात आहे. आपत्कालीन मदत केंद्रदेखील पालिका प्रशासनाच्या इमारतीमध्ये सुरू केले जात असल्याचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी सांगितले.

## ई-रिक्षाच्या सोडतीमध्ये २० जणांना लाभ

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

सनियंत्रण समितीने सध्या २० ई-रिक्षांना परवानगी दिली होती, परंतु एकूण २३ जणांनी आपले फॉर्म भरले होते. त्यामुळे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या उपस्थितीमध्ये सोमवारी (दि.२७)सोडत काढण्यात आली. यामध्ये २० जणांना लाभ मिळाला आहे. या वेळी नगर परिषदेचे अंकुश इचके, सदानंद इंगळे उपस्थित होते.

सनियंत्रण समितीने २० ई-रिक्षासाठी पायलट प्रोजेक्ट म्हणून परवानगी दिली होती. त्या वेळी १५ ई-रिक्षा शालेय विद्यार्थ्यांना आणि उर्वरित पाच पर्यटक, स्थानिकांना वापरण्यात याव्यात असे सूचित केले होते. अखेर २० जणांना लाभ झाला असून उर्वरित ७४ जणांना टप्प्याटप्प्याने लाभ घेता येणार आहे.



**हातरिक्षाच्या अमानवीय प्रथेतून मुक्तता होणार असून ई-रिक्षामुळे आमच्या जीवनात बदल होणात आहे, तसेच माझे अन्य हातरिक्षा बांधवांनादेखील लवकर ई-रिक्षाचा परवाना मिळावा, तेव्हाच श्रमिक रिक्षा संघटनेच्या लढ्याला यश मिळेल.**

**-मारुती कदम, हातरिक्षा चालक**

**अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सोडत काढण्यात आली. सर्वांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. कुणाची हरकत वा तक्रार असल्यास दोन दिवसांत नगर परिषदेच्या कार्यालयात लेखी स्वरूपात द्यावी. या ई-रिक्षाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाणार आहे.**

**-राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान**

## महामार्गावरील डिव्हायडरमधील झाडांना अवकाळीने संजीवनी

**खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर खालापूर ते खोपोली बोरघाट पायथा अशा सहा किमी अंतराचे चौपदरीकरणाचे काम दोन वर्षांपूर्वी झाले, मात्र या मार्गाचे हस्तांतरण आयआरबीने घेतले नसल्याने मागील दोन महिने डिव्हाडरमध्ये लावलेल्या झाडांना पाणी मिळत नव्हते. काही झाडे करपली, मात्र काही तग धरून बसलेल्या झाडांना अवकाळी पावसामुळे जीवदान मिळाल्याने ती बहरू लागली आहेत.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गाचे खालापूर ते खोपोली बोरघाट पायथा राष्ट्रीय महामार्गाचे काम दिलेल्या मुदतीपेक्षा दोन वर्षे उशिरा झाले. खोपोली शिळफाटा ते वरची खोपोली कमानीपर्यंत रुंदीकरण करण्यात आले. या रुंदीकरणात महामार्गावरील अनेक जुने ५०-६० वर्षांपूर्वीचे वृक्ष तोडण्यात आले. ठेकेदाराने एका झाडाच्या बदल्यात पाच झाडे लावावीत अशी अट असतानाही झाडे लावलीच नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. फेब्रुवारी २०२३मध्ये ठेकेदाराने मार्गामधील डिव्हाडरच्या मधल्या भागात खोपोली ते खालापूर या अंतरावर कमी वयाची झाडे लावली व ती काही दिवसांत पाणी न घातल्यामुळे करपून गेली होती.


गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाने मात्र या झाडांना नवसंजीवनी मिळाली आहे, मात्र या झाडांच्या देखभालीची जबाबदारी असणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## तांबाटीमध्ये सीडबॉलच्या माध्यमातून वृक्षारोपण

**चौक : प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी उपयुक्त संदेश देत ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थांच्या माध्यमातून सीडबॉल तयार केले असून वृक्षारोपणासाठी एक अभिनव उपक्रम राबविला आहे.

सध्याचे सातत्याने बदलणारे हवामान, उष्णतेमध्ये होणारी वाढ यामुळे नागरिकांसह, प्राणी, पक्ष्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. यासाठीच ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी माझी वसुंधरा अंतर्गत हा पर्यावरण समतोल आणि परिसरात वनराई निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. प्लास्टिकमुक्ती ते घनकचरा व्यवस्थापन असे अनेक उपक्रम राबविले आहेत.



आता सीडबॉलची निर्मिती ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ, बचत गट, तरुण मंडळ, सामजिक संस्था, विद्यार्थी, शिक्षक, बालवाडी शिक्षिका, मदतनीस, आशा वर्कर यांच्या सहकार्याने करण्यात आले. हे सीडबॉल जवळच्या मोकळ्या जागेत, डोंगर दरीत, माळरानावर टाकण्यात येणार आहेत. हा उपक्रम माझी वसुंधरा अंतर्गत राबविण्याचा संकल्प केला आहे, अशी माहिती ग्रामविकास अधिकारी प्रशांत कदम यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून दिली.

## चरायला सोडलेल्या बैलाची चोरी

**म्हसळा : प्रतिनिधी**

किसन नथुराम म्हात्रे (वय ५०, रा. सकलप खारगाव खुर्द) यांनी आपला बैल जंगलात चरायला सोडला होता, मात्र तो न सापडल्याने म्हसळा पोलिसांत चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

किसन नथुराम म्हात्रे हे नेहमी त्यांच्या चार गायी, बैल आणि दोन वासरे रोज सकाळी ८ वा. जंगलात चरायला सोडतात. ती दिवसभर जंगलात चरतात आणि सायंकाळी ४ वा. परत घरी येतात, परंतु सोडलेल्या जनावरांपैकी तांबड्या रंगाचा सुमारे १५ हजार रुपये किंमत आसलेला बैल १० दिवस होऊनही घरी परत आला नाही. त्याचा सर्वत्र शोध घेण्यात आला, परंतु तो सापडला नाही. त्यामुळे म्हसळा पोलिसात अज्ञाताविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**माणगाव : येथील पत्रकार सलीम शेख यांची कन्या अनम शेख हिने दहावीत ८७.८० टक्के गुण संपादन केल्याने तिचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उद्योजक अरुण क्षीरसागर, शिक्षक शंकर शिंदे, संगणकतज्ज्ञ भालचंद्र खाडे, सामाजिक कार्यकर्ते राहुल दसवते यांनी अभिनंदन करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## घरीच अभ्यास करून 'ती' शाळेत पहिली

**अलिबाग : प्रतिनिधी**

वडील पॅरालिसिसने अंथरुणाला खिळलेले, घरात कमावती आई, अशा आर्थिक बेताची परिस्थिती असूनही कोणत्याही खासगी शिकवणीला न जाता स्वरा संजय भोस्तेकर हिने दहावीत ८८.६० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. स्वरा ही केईएस इंग्लिश मीडियम स्कूल रेवदंडा या शाळेची विद्यार्थिनी आहे.



तिच्या यशात आई, वडिल, शिक्षक आणि स्वतः स्वराचा मोठा वाटा आहे. स्वराला इंग्रजी ८६, मराठी ९०, हिंदी ९३, गणित ८६, सायन्स आणि टेक्नॉलॉजी ८६, सामाजिक शास्त्र ८८ असे एकूण ५००पैकी ४४३ गुण मिळाले. वडिल हे अंथरुणाला खिळले असून आई कामावर जात असल्याने स्वराने याही परिस्थितीत खंबीरपणे आणि एकाग्रतेने अभ्यास करून आपले ध्येय गाठले आहे. तिच्या यशामुळे सर्व स्तरांतून स्वराचे अभिनंदन केले जात आहे.

# माणगावातील विविध शाळांचा १०० टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल सोमवारी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील विविध शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंग्लिश स्कूल जावळी शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेतून साईराज केकाणे ९१ टक्के प्रथम, अनिष्का शिर्के ८२ टक्के द्वितीय, तर आर्यन लहाने याने ८०.६० टक्के संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विद्यार्थ्यांचे



अध्यक्ष सुभाष केकाणे, सचिव भोरावकर गुरुजी, मुख्याध्यापक बरगे, शाळेचे को-ऑर्डिनेटर, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विघवली हायस्कूलने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. शाळेतून आर्या उभारे ९२ टक्के प्रथम, मन पवार ८८.४० टक्के द्वितीय व ओमकार शिंदे याने तृतीय क्रमांक पटकाविला. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष महादेवराव बक्कम, उपाध्यक्ष प्रभाकर उभारे, सचिव बा. द. बेंडखळे, सहसचिव दिलीप उभारे, खजिनदार विनायक सापळे, स्कूल कमिटी चेअरमन नामदेव शिंदे, मुख्याध्यापक पांडुरंग उभारे, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचा निकाल सलग ११व्या वर्षी १०० टक्के लागला विद्यालयात प्रथम कस्तुरी देवकर ८७.८० टक्के, द्वितीय तन्वी महाडीक ८५.८० टक्के, तृतीय विवेक सकपाळ ८५.४० टक्के मिळविले. संस्था अध्यक्ष डॉ. नंदकुमार जोशी, विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव, शाळा समिती अध्यक्ष संजय पालकर, पदाधिकारी, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कूलने आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. सदफ राऊत ९३.०४ टक्के प्रथम, अतुफा राऊत ९१ टक्के द्वितीय, मेहविश दाखवे या विद्यार्थिनीने ९०.८० टक्के संपादन करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. २४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले असून प्रथम श्रेणीत १७, द्वितीय श्रेणीत पाच, नऊ विद्यार्थ्यांनी ८० टक्केपेक्षा अधिक, २४ विद्यार्थ्यांनी ७० टक्केपेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत.

# पहिल्याच फेरीत नदाल गारद




**पॅरिस : वृत्तसंस्था**

क्ले कोर्टचा (लाल माती) सम्राट मानला जाणारा आणि तब्बल १४ वेळा विजेतेपद मिळविणाऱ्या राफेल नदालवर यंदाच्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पहिल्याच फेरीत गारद होण्याची वेळ आली. जर्मनीच्या चौथ्या मानांकित लेक्झांडर झ्वेरेवने सोमवारी पहिल्या फेरीच्या लढतीत नदालचा ६-३, ७-६(७-५), ६-३ असा पराभव केला. नदालला दुखापतीमुळे निर्माण झालेल्या अपयशाच्या चक्रव्यूहातून बाहेर पडता आले नाही. नदालवर कारकीर्दीत प्रथमच या स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभूत होण्याची नामुष्की ओढवली.

कारकीर्दीत २२ ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळविणाऱ्या नदालने सर्वांत प्रथम २००५मध्ये फ्रेंच टेनिस स्पर्धेचे विजेतपद मिळवले. त्यानंतर २०२२मध्ये तो येथे अखेरची स्पर्धा जिंकला. त्यानंतर मात्र दुखापतीने नदालच्या कारकीर्दीला उतरती कळा लागली.

पहिला सेट गमावल्यानंतर नदालने दुसऱ्या सेटमध्ये ४-२ अशी आघाडी मिळवली होती. लढतीमधील दहाव्या गेमला दोन ब्रेक पॉइंट वाचवून झ्वेरेवने सर्व्हिस राखली आणि त्यानंतर टायब्रेकरमध्ये बाजी मारली. तिसऱ्या सेटलाही नदाल सुरवातीलाच ब्रेकची संधी साधून २-० असा आघाडीवर होता. या वेळीही झ्वेरेवने लगेच बाजी मारून २-२ अशी बरोबरी साधली. सातव्या गेमला आणखी एकदा नदालची सर्व्हिस भेदत झ्वेरेवने मिळवलेली आघाडी कायम राखत विजयावर शिक्कामोर्तब केले.

पुरुष एकेरीच्या सामन्यात सिन्नेरने अमेरिकेच्या ख्रिस्तोफर यूबँक्सला ६-३, ६-३, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवत दुसऱ्या फेरीत धडक मारली, तर त्सित्सिपासने हंगेरीच्या मार्टोन फुक्सोविक्सला ७-६ (९-७), ६-४, ६-१ असे पराभूत केले. स्वित्झर्लंडच्या स्टॅन वावरिंकाने ब्रिटनच्या अँडी मरेचे आव्हान ६-४, ६-४, ६-२ असे सरळ सेटमध्ये संपुष्टात आणले. भारताच्या सुमित नागलला कारेन खाचनोवकडून २-६, ०-६, ६-७ (५-७) असे पराभूत व्हावे लागले.

पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑटेकने महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला, तर ग्रीसचा स्टेफानोस त्सित्सिपास व इटलीचा यानिक सिन्नेर यांनीही पुरुष एकेरीच्या सामन्यात विजय नोंदवत आगेकूच केली. महिला एकेरीच्या सामन्यात श्वीऑटेकने फ्रान्सच्या लिओलिया जीनजीनवर ६-१, ६-२ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. ओन्स जाबेऊरने साचिआ विकेरीला ६-३, ६-२ असे पराभूत करत पुढच्या फेरीत स्थान मिळवले.

# नवी मुंबईतील कराटेपटूंनी नेपाळमध्ये पदके जिंकली

**नवी मुंबई : बातमीदार**

इंडो नेपाळ कराटे चॅम्पियनशीप चांदगिरी (नेपाळ) येथे आणि १५वी इंटरनॅशल कराटे चॅम्पियनशिप काठमांडू येथे झाली. यामध्ये नवी मुंबईतील खेळाडूंनी काता आणि कुमिते या प्रकारात चमक दाखवत छाप उमटवली आहे.

नवी मुंबईच्या डीएव्ही शाळेतील विशेष यादव याने ६० किलो वजनी गटात एक सुवर्ण आणि दोन रौप्यपदके पटकावली. रिलायन्स शाळेतील कार्तिक पवार याने ४० किलो वजनी गटात दोन रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले. त्यांना सूरज पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले. पुजारी यांनी आंतरराष्ट्रीय पंच म्हणूनही कामगिरी पार पाडली. दरम्यान, या यशाबद्दल पदकविजेते खेळाडू आणि मार्गदर्शक पुजारी यांचे अभिनंदन होत आहे.



# रोहित शर्माकडून युवा खेळाडूंना नेहमीच सहकार्य -रिंकू सिंग

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाचा आयपीएलचा हंगाम रिंकू सिंगसाठी काही खास राहिला नाही, पण मागील हंगामात त्याने स्फोटक खेळी करून एक नवीन ओळख निर्माण केली. कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलचा किताब जिंकला. रिंकू हा केकेआरच्या संघाचा भाग असून तो ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचा राखीव खेळाडू म्हणून हिस्सा आहे. आयपीएल जिंकल्यानंतर आणि विश्वचषकासाठी रवाना होण्यापूर्वी रिंकूने विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला.



भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माचे कौतुक करताना रिंकूने सांगितले की, रोहित शर्मा नेहमी युवा खेळाडूंना सहकार्य करतो. कर्णधार म्हणून त्याने मिळवलेले यश जगासमोर आहे. युवा खेळाडूंनी चांगली कामगिरी करावी असे त्याला नेहमी वाटते.

रिंकूने त्याच्या कमाईबद्दलही भाष्य केले. तो म्हणाला की, मला आयपीएलमधून मिळत असलेली ५५ लाख रुपयांची रक्कम खूप आहे. मी मोठा होत असताना त्या वेळी मी केवळ ५-१० रुपये कसे मिळवू शकतो याचा विचार करत असे, पण आता माझा आयपीएलमधील पगार ५५ लाख रुपये आहे, जो माझ्यासाठी खूपच जास्त आहे. देव जेवढे देतो त्यातच खुश राहायला हवे असे मला वाटते.

# आयपीएल गाजवलेल्या खेळाडूंना भारतीय संघात मिळू शकते संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल हे सुरुवातीपासूनच खेळाडूंसाठी एक माध्यम आहे, जिथे चांगली कामगिरी करून खेळाडू भारतीय संघात प्रवेश करण्यात यशस्वी होतात. दरवर्षी आयपीएलमध्ये असे चमकणारे खेळाडू तयार होतात, जे नंतर भारतीय संघाचे नाव उज्ज्वल करण्याचे काम करतात, ही यादी मोठी आहे. आता आयपीएल २०२४चा हंगाम संपला आहे. आता लवकरच कोणते खेळाडू भारतीय संघात दाखल होतात याची प्रतीक्षा आहे.



आतापर्यंत भारतीय संघाचे पुढील मिशन टी-२० विश्वचषक आहे. यासाठी संघाची घोषणा आधीच करण्यात आली होती. म्हणजेच यामध्ये कोणत्याही नवीन खेळाडूला संधी मिळणे कठीण आहे, मात्र वर्ल्डकपनंतर टीम इंडिया झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार आहे. भारतीय संघाची कामगिरी काहीही असली तरी विश्वचषकानंतर भारतीय संघातील अनेक मोठे खेळाडू विश्रांती घेताना दिसतील असे मानले जाते. अशा परिस्थितीत आयपीएलच्या अनकॅप्ड स्टार खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता आहे.

ज्या खेळाडूंनी आयपीएलच्या मोसमात सर्वाधिक प्रभाव पाडला आहे आणि ज्यांनी अद्याप भारतीय संघात पदार्पण केले नाही, त्यापैकी पहिले नाव समोर येते ते म्हणजे अभिषेक शर्मा. सनरायझर्स हैदराबादकडून खेळणाऱ्या अभिषेकने फायनलमध्ये चांगली कामगिरी केली नसेल, परंतु संपूर्ण हंगाम त्याच्यासाठी चांगला गेला. संघाला अंतिम फेरीत पोहचवण्यातही त्याचा मोठा वाटा होता हे कुणापासून लपून राहिलेले नाही. अभिषेकने यंदाच्या आयपीएलमध्ये १६ सामने खेळून ४८४ धावा केल्या आहेत. त्याने तीन अर्धशतके झळकावली आहेत.

याशिवाय आणखी एका खेळाडूबद्दल बोलायचे झाले तर तो म्हणजे रियान पराग, जो राजस्थान रॉयल्सकडून खेळतो. रियान गेली अनेक वर्षे राजस्थान रॉयल्सकडून आयपीएल खेळत असला तरी हा मोसम त्याच्यासाठी चांगला गेला. राजस्थानने त्याला सलग चौथ्या क्रमांकावर फलंदाजीची संधी दिली, जिथे त्याने स्वत:ला सिद्ध केले. त्याने या वर्षी १६ सामने खेळून ५७३ धावा केल्या आहेत. त्यात चार अर्धशतकांचा समावेश आहे. भारतीय संघासाठी त्याने दावा मजबूत केला.

अभिषेक व रियान या दोन खेळाडूंबाबत बरीच चर्चा झाली, पण या यादीत आणखी काही खेळाडूंचा समावेश आहे, ज्यांची फारशी चर्चा होऊ शकली नाही. गुजरात टायटन्सकडून खेळणाऱ्या साई सुदर्शनसाठीही हा मोसम चांगला होता. त्याने १२ सामने खेळून ५२७ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ४७.९१ आणि स्ट्राइक रेट १४१.२८ आहे. जर आपण एसआरएचच्या नितीश कुमार रेड्डीबद्दल बोलायचे, तर त्याला इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझनचा पुरस्कारदेखील देण्यात आला आहे. तो एक अष्टपैलू खेळाडू आहे आणि लवकरच त्यालाही भारतीय संघात खेळण्याची संधी मिळू शकते.

# कल्याणहून होणार कांगा लीग क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत होत असलेल्या प्रसिद्ध कांगा लीग क्रिकेट स्पर्धेसाठी प्रथमच कल्याणमध्ये खेळाडूंची निवड होणार आहे.




रिमझिम पाऊस, ढगाळ वातावरण, ओली निसरडी खेळपट्टी, वाढलेले गवत आणि ठिकठिकाणी चिखलाने माखलेली आऊटफिल्ड ही क्रिकेटविश्वातल्या या आगळ्यावेगळ्या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. पावसाळी मोसमात खेळवली जाणारी जगातील एकमेव अशी मुंबई क्रिकेट असोसिएशनची ही स्पर्धा. कांगा लीग क्रिकेट स्पर्धेत खेळणाऱ्या खेळाडूंना पुढे जाण्याची संधी असते. या नामांकित स्पर्धेत खेळण्यासाठी अनेक होतकरू क्रिकेटपटू कायम उत्सुक असतात. यंदा प्रथमच कल्याण परिसरातील क्रिकेट खेळाडूंची निवड कल्याणमध्येच होणार आहे.

३१ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून निवड प्रक्रिया सुरू होणार आहे. युनियन क्रिकेट ॲकडमी, पोद्दार इंटरनॅशनल स्कूलसमोर, वायले नगर, कल्याण पश्चिम येथे ही निवड प्रक्रिया होईल. कांगा लीग 'फ' क्रिकेट टीम निवडीसाठी वयाची कोणतीही अट नाही. इच्छुक खेळाडूंनी मोठ्या संख्येने या निवड चाचणीसाठी उपस्थित रहावे, असे आवाहन युनियन क्रिकेट कदमीचे तुषार सोमाणी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९३२३८९०१८९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचेही कळविण्यात आले आहे.

# चॅम्पियन झाल्यानंतर कोलकाता संघ विजयाच्या जल्लोषात

## अभिनेत्री अनन्या पांडेसोबत आंद्रे रसेल थिरकला

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या अंतिम फेरीत कोलकाता नाईट रायडर्स संघाने सनरायझर्स हैदराबादचा आठ गडी राखून पराभव केला. या विजयासह केकेआर संघाने तिसऱ्यांदा आयपीएलमध्ये विजेतेपद पटकावले. चॅम्पियन झाल्यानंतर संपूर्ण केकेआर संघ विजयाच्या जल्लोषात मग्न झाला होता. सोशल मीडियावर पार्टीमधील अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. असाच एक व्हिडीओ स्टार खेळाडू आंद्रे रसेलचा आंहे, जो बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडेसोबत किंग खानच्या गाण्यावर डान्स करतानाचा आहे.



व्हायरल व्हिडीओमध्ये आंद्रे रसेलच्या हातात ग्लास असून तो शाहरूख खानच्या गाण्यावर डान्स करण्याचा आनंद घेत आहे. रसेल हा शाहरूखच्या डंकी चित्रपटातील लूट-पुट गया या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. याआधीही रसेल या गाण्यावर रिल बनवताना दिसला आहे, पण या वेळेस त्याच्यासोबत अनन्या पांडेही होती. रसेलचा सहकारी रमणदीप सिंग आणि केकेआरचे मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत पंडितही याच गाण्यावर नाचताना दिसत आहेत.

कोलकाताला तिसऱ्यांदा चॅम्पियन बनवण्यात आंद्रे रसेलने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या मोसमात त्याने १५ सामन्यात २२२ धावा केल्या आणि १९ विकेटही घेतले. इतकेच नव्हे तर अंतिम सामन्यात त्याने संघासाठी सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.

# मिचेल स्टार्ककडून निवृत्तीचे संकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाईट रायडर्ससाठी सर्वच खेळाडूंनी शानदार कामगिरी केली. सांघिक कामगिरीच्या जोरावर कोलकाताने संपूर्ण हंगामात दमदार कामगिरी करीत संघाला ट्रॉफी पटकावून दिली. अंतिम सामन्यात केकेआरच्या गोलंदाजांनी तर सनरायझर्स हैदराबादच्या विस्फोटक फलंदाजांवर अंकुश ठेवत त्यांना सामन्यात पुनरागमन करण्याची एकदाही संधी दिली नाही. या एकतर्फी विजयानंतर केकेआरच्या मोठ्या खेळाडूने एक निवृत्तीचे संकेत दिले आहेत.



**मी निश्चितपणे माझ्या करिअरच्या शेवटच्या टप्प्यात आहे. एका आंतरराष्ट्रीय फॉर्मेटमधून मी बाहेर पडू शकतो, कारण पुढच्या विश्वचषकापर्यंत अजून बराच वेळ आहे आणि मी या फॉरमॅटपासून दूर झालो तर फ्रँचायझी क्रिकेटसाठी दरवाजे उघडे होतील.**
**-मिचेल स्टार्क**

अंतिम सामन्यातीस केकेआरच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणारा ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने आणखी फ्रँचायझी क्रिकेट खेळण्यासाठी एक फॉरमॅट वगळण्याचे संकेत दिले आहेत. स्टार्क हा आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक मानधन घेणारा खेळाडू आहे. केकेआरने यंदाच्या मोसमासाठी २४.७५ कोटी रुपये खर्चून स्टार्कला संघाला घेतले होते.


राष्ट्रीय संघाशी असलेल्या बांधिलकीमुळे जवळपास दशकभर लीग न खेळणाऱ्या स्टार्कने त्याच्या वेळापत्रकात अधिक फ्रँचायझी क्रिकेटचा समावेश करण्यासाठी एक फॉरमॅट सोडण्याचे संकेत दिले आहेत. ३४ वर्षीय वेगवान गोलंदाजाने त्याला कोणते फॉरमॅट सोडायचे आहे हे सांगितले नाही.

# रियान परागची युट्यूब सर्च हिस्ट्री लीक

**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज रियान परागने यंदाच्या आयपीएलमध्ये अप्रतिम कामगिरी केली. यंदाच्या हंगामात रियानची बॅट चांगलीच तळपली व त्याने राजस्थानसाठी खेळताना सर्वाधिक ५७३ अधिक धावा केल्या, पण आयपीएल संपल्यानंतर रियान एका वेगळ्याच वादात अडकला आहे. त्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्याची यूट्यूब सर्च हिस्ट्री यामध्ये दिसत आहे.

व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो एखादे गाणे सर्च करायला जातो, तेव्हा युट्यूबची सर्च हिस्ट्री दिसू लागते. यामध्ये अनन्या पांडे आणि सारा अली खानच्या हॉट व्हिडीओचे कीवर्ड सर्च केलेले दिसत आहेत. ही माहिती ऑनलाइन लीक झाल्यानंतर रियान पराग चर्चेचा विषय ठरला आहे.



२२ वर्षीय राजस्थान रॉयल्सचा स्टार खेळाडू रियान परागदेखील यूट्यूबवर स्ट्रीमिंग करतो. परागने असेच त्याच्या गेमिंग सत्रादरम्यान युट्यूबवर लाइव्ह स्ट्रिमिंग सुरू केले. या वेळी तो युट्यूबवर कॉपी राईट फ्री म्युझिक सर्च करीत होता आणि तेव्हा त्याची सर्च हिस्ट्री दिसू लागली. रियान गाणे सर्च करताना त्याची स्क्रिन सुरू होतीच. परागने आधी सर्च केलेले काही कीवर्ड दिसू लागले. यामध्ये सारा अली खान हॉट, अनन्या पांडेसारखे कीवर्ड होते. परागशी संबंधित हा स्क्रीनशॉट आणि व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे.

एका एक्स युजरने रियानचा हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. त्या कॅप्शनमध्ये लिहिले, 'रियान परागची सर्च हिस्ट्री सारा अली खान हॉट, विराट कोहली, अनन्या पांडे हॉट.

रियान परागचा या आधीही काही वादांमध्ये अडकला होता. एकदा आयपीएलदरम्यान त्याचे मोहम्मद सिराज आणि हर्षल पटेल यांसारख्या वरिष्ठ खेळाडूंसोबत भांडण झाले होते. याशिवाय रियान त्याच्या सोशल मीडिया पोस्टमुळेही वादात सापडला आहे. त्याच्या पोस्टमध्ये अहंकार दिसून येतो आणि त्यामुळे त्याला ट्रोल केले जाते.

# सचिन तेंडुलकरने 'केकेआर'च्या गोलंदाजांना दिले यशाचे श्रेय

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाईट रायडर्सने अंतिम फेरीत चमकदार कामगिरी करीत तिसऱ्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावण्यात यश मिळविले. केकेआर चॅम्पियन बनल्यानंतर सचिन तेंडुलकरने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करीत संघातील गोलंदाजांचे कौतुक केले. सचिनने केकेआरच्या विजयाचे खरे नायक त्यांच्या गोलंदाजांना म्हटले आहे.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करताना लिहिले, केकेआरने सातत्यपूर्ण कामगिरी करीत आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले. त्यांच्या फलंदाजांनी हंगामाची सुरुवात दमदार केली, परंतु स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्यात गोलंदाजांनी आपला प्रभाव दाखवला आणि ते केंद्रस्थानी राहिले. अंतिम फेरीत सर्व गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

केकेआरच्या गोलंदाजांचे कौतुक करताना सचिन तेंडुलकर पुढे म्हणाला, त्यांनी झटपट विकेट्स घेत हैदराबाद संघाला कमी धावसंख्येवर रोखले, ज्यामुळे केकेआर संघाला धावांचा पाठलाग करणे सोपे झाले. आपल्या संघासाठी तिसरी ट्रॉफी जिंकल्याबद्दल सर्व खेळाडूंचे आणि कोचिंग स्टाफचे अभिनंदन तसेच शाहरूख खान आणि गौतम गंभीरचेही अभिनंदन. त्याचबरोबर ज्या संघाने गेल्या दोन महिन्यांत आयपीएलमध्ये अनेकदा छाप पाडली, परंतु अंतिम फेरीत विजय मिळवू शकले नाहीत, अशा सनरायझर्स हैदराबाद संघाचेही अभिनंदन.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com